# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्य विद्युत वितरण कंपनीकडून (जि.अहमदनगर) शेतकऱ्यांना नवीन ट्रान्सफार्मरसाठी विलंब होत असल्याबाबत

**(१) ९८८ (१८-०३-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात राज्य विद्युत वितरण कंपनीकडून शेतकऱ्यांना नवीन ट्रान्र्सफार्मर, जळालेला ट्रान्सफार्मर, ऑईल व नवीन विद्युत जोडणी यासाठी देयके अदा करुन देखील माहे डिसेंबर, २०१९ अखेर मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीच्या अधिकारी वर्गाकडून वेगवेगळी कारणे सांगुन एक-दोन ट्रान्सफार्मरसाठी २/२ महिने वेठीस धरले जाते त्यामुळे शेतकरी हवालदील झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील कामांना निश्चित कालमर्यादा आखुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०५-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही. अहमदनगर मंडल कार्यालय अंतर्गत माहे मार्च, २०१८ अखेर ७,३३२ कृषीपंप धारकांना वीज जोडणी पैसे भरुन प्रलंबित असून त्यापैकी दिनांक ०९/०७/२०२१ अखेर ५,८५६ कृषीपंप धारकांना उच्चदाब प्रणाली अंतर्गत वीज जोडणी देण्यात आली आहे. तसेच मुख्यमंत्री सौर योजनेंतर्गत मे, २०२१ पर्यंत २,४३७ कृषीपंप धारकांना सौर पंप वितरीत करण्यात आलेले आहे.

डिसेंबर, २०१९ अखेर नादुरुस्त सर्व रोहित्रे बदलण्यात आलेली आहेत. अहमदनगर मंडल कार्यालयात माहे जानेवारी, २०२० ते मार्च, २०२० अखेर १,३९८ रोहित्रे नादुरुस्त असून सर्व रोहित्रे बदलण्यात आलेली आहेत.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यातील सात शहरात सुमारे ८१००० फ्लॅट्‌स तयार स्थितीत विनावापर असल्याबाबत

**(२) ३९०१ (१७-०७-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील सात शहरात सुमारे ८१००० फ्लॅट्‌स तयार स्थितीत विनावापर असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाळेबंदी दरम्यान ढासळलेल्या अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यासाठी मुद्रांक शुल्क कमी करण्याबाबत महाराष्ट्र उद्‌योग व व्यापार महासंघ कमिटीने शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त कमिटीच्या मागणीनुसार शासनस्तरावर निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२७-०७-२०२१) :** (१), (२) व (३) नोंदणी व मुद्रांक विभागाच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रिय दुय्यम निबंधक कार्यालयांमार्फत स्थावर तथा अचल व चल मालमत्तांच्याबाबतीत दस्तांच्या नोंदणीची कार्यवाही पार पाडली जाते. जोपर्यंत असा दस्त नोंदणीसाठी येत नाही तोपर्यंत सदर मिळकत विनावापर आहे की कसे? याबाबत भाष्य करणे शक्य होत नाही.

तथापि, महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक वाढीस आणि गुंतवणूकीच्या ओघास प्रोत्साहन देण्यासाठी रिअल इस्टेट संदर्भात शासनामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या दिपक पारेख समितीने केलेल्या शिफारशींस अनुलक्षून महाराष्ट्र शासनाने दिनांक २९ ऑगस्ट, २०२० व दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजीच्या अधिसूचित आदेशांन्वये कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर राज्यातील जनतेला स्थावर मिळकत खरेदी करण्यास दिलासा देण्याच्या अनुषंगाने कोणत्याही स्थावर मिळकतीबाबतच्या अभिहस्तांतरणपत्र किंवा विक्रीकरारपत्राच्या आणि भाडेपट्ट्याच्या दस्तऐवजावर आकारणी योग्य असलेल्या मुद्रांक शुल्कामध्ये सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार, प्रचलित असलेला मुद्रांक शुल्काचा दर दिनांक १ सप्टेंबर, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीसाठी मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात तीन टक्केने आणि उर्वरित महाराष्ट्र राज्यात दोन टक्केने कमी केला आहे. याशिवाय, उक्त कालावधीत मुद्रांक शुल्क स्वरुपात वसुल केला जाणारा स्थानिक संस्था अधिभार हा देखिल संपूर्ण राज्यभर माफ करण्यात आला आहे. तर, दिनांक १ जानेवारी, २०२१ ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीसाठी मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्यात उक्त दर दोन टक्केने आणि उर्वरित महाराष्ट्र राज्यात दिड टक्केने मुद्रांक शुल्क कमी करुन मुद्रांक शुल्क स्वरुपात वसुल केला जाणारा स्थानिक संस्था अधिभार संपूर्ण राज्यभर अर्धा टक्केने कमी करण्यात आला होता.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील पनवेल व उरण ग्रामीण भागातील विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याच्या कामाबाबत

**(३) ४४०४ (१४-०९-२०२०) श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण कार्यक्रमांतर्गत सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान रायगड जिल्ह्यातील विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याचा प्रकल्प शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकाल्पांतर्गत पनवेल व उरण शहरातील विविध भागात भूमिगत विद्युत वाहिन्या टाकण्यात येणार असून सदर प्रकल्पाचे कामाचे सर्वक्षण लोना पॉवर या कंपनीकडून सुरू केले आहे, पावसाळा संपल्यावर काम सुरू करण्यात येईल असे विद्युत मंडळाचे सहायक अभियंता, अलिबाग-रायगड यांच्याकडून माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान सांगण्यात आले होते परंतु, अद्याप सदरच्या कामास सुरूवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जागतिक बँकेचे अर्थसहाय्य असलेला अलिबाग परिसरातील विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याचा प्रकल्प शासनाच्या अनास्थेमुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याचे काम पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०५-१०-२०२१) :** (१) व (२) राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण कार्यक्रम फेज १ ला (आंध्र प्रदेश व ओडीसा राज्याकरीता) केंद्र शासनाने दिनांक २७/०१/२०११ रोजी मंजूरी दिलेली होती. राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण कार्यक्रम फेज-२ ला (महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक, केरळ आणि पश्चिम बंगाल राज्याकरीता) केंद्र शासनाने दिनांक २४/०६/२०१५ रोजी मंजुरी दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाने मे. लीना पॉवरटेक इं.प्रा.लि. यांना दिनांक १३/०६/२०१९ रोजी रायगड जिल्ह्यातील अलिबाग परिसरातील विद्युत

वाहिन्या भूमिगत करण्याचा कार्यादेश दिलेला आहे. परंतु या प्रकल्पाअंतर्गत पनवेल व उरण शहरातील विविध भागात भूमिगत विद्युत वाहिनी टाकण्याचे कामाचा समावेश नाही.

(३) अलिबाग परिसरातील विद्युत वाहिन्या भूमिगत करण्याचे काम प्रगतीपथावर असून ४४ % कामे पूर्ण झाली आहेत. कोविड-१९ च्या वैश्विक महामारीमुळे तसेच निसर्ग/तौक्ते चक्रीवादळा मुळे कामास विलंब झाला आहे.

(४) शासनाने दिनांक १२/०६/२०२० रोजीच्या पत्रान्वये महावितरणला राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण कार्यक्रम फेज-२ अंतर्गत अतिरिक्त आर्थिक प्रकल्प अहवाल सादर करण्याबाबत कळविले होते. या अनुषंगाने दिनांक ३/०९/२०२० रोजी ०६ मंडळाकरीता (पेण, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, वाशी, वसई व पालघर मंडळ) रुपये २७८४.२७ कोटींचा अतिरिक्त आर्थिक प्रकल्प अहवाल महावितरण कडून मंजूरी करीता सादर करण्यात आलेला आहे. यामध्ये वाशी मंडळाअंतर्गत पनवेल ग्रामीण उपविभागाचे रुपये २१.३२ कोटी व उरण उपविभागाचे रुपये १५६.१४ कोटीच्या प्रस्तावाचा समावेश केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयात विद्युत विभागाच्या गलथान कारभारामुळे अपघात होत असल्याबाबत

**(४) ५२४२ (२३-११-२०२०) डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात विद्युत विभागाच्या गलथान कारभारामुळे अपघात होऊन अनेक नागरिक मृत्यूमुखी पडत असून त्यांच्या कुटुंबियांना कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्युत अपघातामध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना तातडीने शासकीय मदत मिळण्याबाबत तसेच या अपघातांना कारणीभूत असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०५-१०-२०२१) :** (१) व (२) यवतमाळ जिल्ह्याअंतर्गत यवतमाळ मंडळामध्ये वर्ष २०२०-२१ मध्ये माहे ऑक्टोबर २०२० अखेरीस ४६ प्राणांतिक विद्युत अपघात होऊन मृत्यूमुखी पडलेल्या नागरिकांची संख्या ५० इतकी आहे. सदर अपघातांची विद्युत निरीक्षक, यवतमाळ कार्यालयाकडून चौकशी करण्यात आली असून सदोष वीज संच मांडणी इ. यामुळे झालेला असून ७ प्रकरणांमध्ये महावितरण दोषी असल्याचे निदर्शनास आले आहे. यवतमाळ विभागातील एकूण ४ प्रकरणे, पांढरकवडा विभागातील एकूण १ प्रकरण व पुसद विभागातील एकूण २ प्रकरणे आहेत. विद्युत अपघातास महावितरण जबाबदार असलेल्या प्रकरणामध्ये मृतकाच्या वारसास तात्काळ मदत म्हणून रुपये २०,०००/- इतकी दिली जाते. यामध्ये यवतमाळ विभागाअंतर्गत १ प्रकरणामध्ये, पुसद विभागाअंतर्गत २ प्रकरणामध्ये तातडीची मदत म्हणून प्रत्येकी रुपये २०,०००/- इतक्या रकमेचा धनादेश देण्यात आलेला आहे. तसेच नुकसान भरपाई मिळणेकरीता आवश्यक दस्तावेजाची पुर्तता न केल्यामुळे यवतमाळ मंडळ कार्यालया अंतर्गत एकूण ७ प्रकरणे प्रलंबित आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेतकऱ्यांना रोहित्रांची दुरुस्ती महावितरणकडून वेळेत करुन दिली जात नसल्याबाबत

**(५) ५७६७ (२३-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणकडून शेतातील जळालेले रोहित्र दुरुस्त करून दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना रोहित्रांची दुरुस्ती महावितरणकडून वेळेत करुन दिली जात नाही, या रोहित्राच्या दुरुस्तीसाठी शेतकऱ्यांकडून पैसे घेतले जातात, पैसे घेऊन देखील वेळेत मिळत नसल्याने पर्यायाने खाजगी व्यक्तीकडून शेतकऱ्यांना हे रोहित्र दुरुस्त करून घ्यावे लागते, अशा तक्रारी राज्यभरात शेतकऱ्याकडून केल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रोहित्राची वाहतूक ही महावितरणकडून शेतापर्यंत करण्यात येते मात्र राज्यात कुठेही तसे न होता शेतकऱ्यांना स्वखर्चातून ही वाहतूक रोहित्र दुरुस्तीच्या खर्चासह करावी लागते मात्र याचा वाहतूक खर्च दाखवून महावितरण कर्मचारी-अधिकारी संगनमताने वरील रक्कम स्वत: घेत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्याकडून वारंवार केल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोहित्रांची दुरुस्ती शेतकऱ्यांना वेळेत करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (०५-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) राज्यात एका वर्षात जवळपास ५५ हजार ३ फेज रोहित्रे नादुरुस्त होतात. रोहित्रे नादुरुस्त होण्याचे प्रमाण जुलै ते नोव्हेंबर या महिन्यात शेतीपंपाचा भार वाढल्यामुळे जास्त असते. राज्यात माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर महिन्यात पावसाचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे नादुरुस्त रोहित्रे बदलण्याकरीता गेलेल्या वाहनास शेतातून रस्ता नसल्याने, पावसाचे पाणी साचल्याने नादुरुस्त रोहित्रे बदलण्याकरीता काही प्रमाणात विलंब होतो.

(३) राज्यभर विभागनिहाय एम्पॅनेलमेंटद्वारे ३३०४ ठेकेदारांना रोहित्रे बदली करण्यासाठी नियुक्त करण्यात आले आहे. नादुरुस्त रोहित्र उभारणीच्या ठिकाणापासून ते विभागीय भांडारापर्यंत व नवीन दुरुस्त केलेले रोहित्र विभागीय भांडारापासून ते रोहित्र उभारणीच्या ठिकाणापर्यंत वाहतुकीचे काम नियुक्त ठेकेदाराकडून करण्याबाबतचे निर्देश क्षेत्रिय कार्यालयास देण्यात आलेले आहेत. त्यानुसार सदर कामे नियुक्त ठेकेदारांकडून करण्यात येतात.

(४) नादुरुस्त रोहित्रे दुरुस्त करण्याकरता राज्यभर विभाग निहाय मंडळस्तरावर एकूण १,४८७ रोहित्रे दुरुस्ती एजन्सीज सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या तीन वर्षासाठी नियुक्त करण्यात आल्या आहेत. नियुक्त केलेल्या एजन्सी कडून लवकरात लवकर रोहित्रे दुरुस्ती करुन घेतले जातात व नादुरुस्त रोहित्रे ताबडतोब बदली करुन दिली जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील महानगरपालिका व नगरपालिकांच्या क्षेत्रात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याच्या निर्णयाबाबत

**(६) ६५४२ (१७-०३-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते पुन्हा वापरण्यायोग्य करण्याचा प्रकल्प सन २०२४ पर्यंत ठिकठिकाणी उभारण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून त्यासाठी २,८२० कोटी रुपयांच्या पहिल्या टप्प्यातील आराखड्यास माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार उभारावयाच्या प्रकल्पांचे स्वरुप काय आहे, त्याकरीता सन २०२४ पर्यंत अंदाजे किती निधी, कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे व प्रकल्प किती टप्प्यात पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, पहिल्या टप्प्यातील मंजूर आराखड्यासाठी लागणारा रुपये २,८२० कोटीचा निधी प्रत्यक्षात कशाप्रकारे व केव्हा उपलब्ध करण्यात आला वा येणार आहे, त्यापैकी कोणत्या ठिकाणच्या, कोणत्या प्रकल्पासाठी, कोणत्या निकषानुसार, किती निधी वितरित करण्यात आला वा येणार आहे, त्यानुसार कामे किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०९-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) मा.राष्ट्रीय हरित लवादाच्या दिशानिर्देशानुसार नागरी भागामध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया करणे सर्व नागरी संस्थाना बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुषंगाने शासनाने दिनांक २६ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये याबाबत धोरण निश्चित केले आहे.

या अनुषंगाने राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये एकूण अंदाजे ९७५८ एमएलडी इतक्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची गरज असून यापैकी ७७४७ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची क्षमता शासनाच्या विविध योजनांमधून नागरी स्थानिक संस्था निधीतून निर्माण करण्यात आली आहे/ निर्माणाधीन आहे.

उर्वरित मलप्रक्रिया क्षमतेबाबत राज्यातील बृहन्मुंबई वगळता इतर सर्व महानगरपालिका व नगरपरिषदांसाठी डिसेंबर, २०२४ अखेर तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी टप्पेनिहाय कालमर्यादा सप्टेंबर, २०२८ अखेर कालमर्यादा निश्चित करण्यात आली असून याबाबत शासनाद्वारे धोरण निश्चिती करण्यात आली आहे.

राज्यातील बृहन्मुंबई वगळता इतर सर्व महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये निर्माणाधीन/ प्रगतीपथावर असलेले मलप्रक्रिया प्रकल्प डिसेंबर, २०२४ अखेर पूर्ण करण्याचे शासनाचे नियोजन आहे.

राज्यातील सर्व अमृत शहरांमध्ये आणि अमृत शहरे वगळता इतर सर्व नगरपरिषदा, नगरपंचायतीमध्ये आवश्यक असलेली अतिरिक्त २०११ एमएलडी मलप्रक्रिया क्षमता ही केंद्र शासनाने नव्याने घोषित होणाऱ्या जलजीवन अभियान (नागरी) किंवा अन्य योजनेतून किंवा राज्य शासनाच्या महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानातून मंजूर करण्याचे शासनाचे नियोजन आहे.

राज्यातील सर्व नागरी क्षेत्रात सांडपाणी प्रक्रिया व्यवस्था निर्माण करण्याच्या कामाचे स्वरूप व्यापक असून यास बराच कालावधी लागणे अपेक्षित आहे. त्यानुषंगाने सादर प्रकल्पाच्या कामास सुरुवात झाल्यानंतर किमान ३० महिन्यांचा कालावधी प्रकल्प कार्यान्वित होण्यासाठी लागणे अपेक्षित आहे.

---

## औरंगाबाद महानगरपालिका प्रशासनाने शहरतील व्यापाऱ्यांना परवाना शुल्क लागू केल्याबाबत

**(७) ६६१३ (१७-०३-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिका प्रशासनाने शहरातील व्यापाऱ्यांना परवाना शुल्क लागू करण्याचा प्रस्ताव माहे जानेवारी, २०२१ मध्ये मंजूर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयास व्यापारी वर्गाकडून तीव्र विरोध दर्शविला जात असून शहरातील व्यापाऱ्यांनी आपल्या मागण्याबाबतचे निवेदन महानगरपालिका प्रशासनाकडे सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने फेरविचार करुन कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०९-२०२१)** : (१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार महानगरपालिका हद्दीत विविध व्यवसाय करणाऱ्या आस्थापनांनी महानगरपालिकेचा व्यवसाय परवाना घेणे बंधनकारक आहे.

उक्त कामांखाली देय असलेले परवाने न दिल्यामुळे त्यातुन वसूल होऊ शकणाऱ्या सुमारे रुपये/०१/३३ कोटी एवढ्या महसूलाचे नुकसान झाल्याचा आक्षेप महालेखाकार (लेखापरिक्षा), नागपूर यांनी दिनांक १०/०३/२०१४ रोजी नोंदविला आहे.

परवाना शुल्क सुधारीत दर व वसूलीच्या कार्यपध्दतीबाबतचा सुधारीत प्रस्ताव डिसेंबर, २०१८ च्या मा.सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला होता.

परंतु सर्वसाधारण सभेने सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवल्याने महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार सदर प्रस्तावास शासन दिनांक २६/११/२०२० अन्वये शासनाची मान्यता देण्यात आली, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) परवाना शुल्क लागू करण्याचा निर्णय रद्द करण्याची विनंती औरंगाबाद जिल्हा व्यापारी महासंघाने दिनांक २०/०२/२०२१ रोजीच्या निवेदनाव्दारे औरंगाबाद महानगरपालिकेकडे केली आहे.

सदर निवेदन प्राप्त झाले असून प्रकरण निर्णयाधीन असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यात अति उच्चदाबामुळे जळालेल्या रोहित्रांबाबत

**(८) ७५०७ (१५-०३-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात अति उच्चदाबामुळे दिनांक १ एप्रिल ते १५ डिसेंबर या कालावधीत एकूण १२२५ विद्युत रोहित्रे जळाली असून त्यापैकी ११९० विद्युत रोहित्रे दुरूस्त करून ग्राहकांना दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोहित्रांना अति उच्चदाबाचा वीज पुरवठा होण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्युत रोहित्रांना नियमित दाबाचा वीज पुरवठा होवून रोहित्र जळणार नाहीत यासाठीच्या कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत व त्यासाठी लागणारा अपेक्षित कालावधी किती आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (१३-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे. दिनांक १ एप्रिल ते १५ डिसेंबर या कालावधीत एकूण १३६५ वितरण रोहित्रे नादुरुस्त झालेली होती. सदर सर्व नादुरुस्त रोहित्रे बदलण्यात आलेली आहेत.

(२) दिनांक १ एप्रिल ते १५ डिसेंबर या कालावधीत हिंगोली जिल्ह्यातील विद्युत रोहित्रे अतिउच्चदाबामुळे नादुरुस्त झालेली नसून ती विविध तांत्रिक कारणांमुळे नादुरुस्त झालेली होती.

(३) विद्युत रोहित्रांना नियमित दाबाचा वीज पुरवठा होण्याकरीता सौभाग्य योजनेंतर्गत २२१, पं.दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेंतर्गत १११, एकात्मिक ऊर्जा विकास योजनेंतर्गत ८८ आणि कृषीपंप उच्चदाब वितरण प्रणाली योजनेंतर्गत ३,५३४ अशा एकूण ३,९५४ वितरण रोहित्रांची उभारणी करण्यात आलेली आहे. तसेच तीन वर्षाच्या करारासाठी स्थानिक परवानाधारक विद्युत ठेकेदाराची नामिकाप्रविष्ट (Empanelment) करुन उच्चदाब/लघुदाब आणि वितरण रोहित्रे याची दुरुस्ती व देखभाल करण्यासाठी नियुक्ती केली असून सदर विद्युत ठेकेदार वेळोवेळी वितरण रोहित्राची दुरुस्ती व देखभाल करीत असल्यामुळे विद्युत रोहित्रांना नियमीत व योग्य दाबाने वीज पुरवठा होत आहे.

नादुरूस्त रोहित्रे दुरूस्त करण्याकरता हिंगोली मंडळासाठी एकूण १९ रोहित्रे दुरूस्ती एजन्सीज सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ या तीन वर्षासाठी नियुक्त करण्यात आल्या आहेत. हिंगोली मंडळास वर्ष २०२०-२१ मध्ये भांडारातून एकूण २३९ किलो लिटर व वर्ष २०२१-२२ मध्ये एकूण २६ किलो लिटर ऑईल पुरविण्यात आलेले आहे. नादुरूस्त रोहित्रे दूरूस्त करण्यासाठी लागणाऱ्या ऑईल अभावी रोहित्रे नादुरुस्त राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे घोडबंदर येथील भूमापन क्र. ७२/२ मिळकतीवर मे.रवी डेव्हलपर्स या विकासकाने अनधिकृतरित्या बांधकाम सुरु केल्याबाबत

**(९) ८१७३ (१७-०३-२०२१) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घोडबंदर येथील भूमापन क्र. ७२/२ या श्री.लोकमान्य पाटील व कुटुंबियांच्या मिळकतीवर मे.रवी डेव्हलपर्स या विकासकाने खोटे दस्तऐवज तयार करून आणि मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून बांधकाम परवानगी मिळवून अनधिकृत बांधकाम सुरु केल्याची बाब दिनांक १ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्यानुषंगाने सदरहू मिळकतीवर अनधिकृत बांधकाम करणाऱ्या विकासकावर तसेच विकासकास बांधकाम परवानगी देणाऱ्या मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१)** : (१) व (२) मौजे घोडबंदर येथील स.क्र. ७२/२ या जागेवर अनधिकृत बांधकाम सुरू असल्याबाबतची श्री.जतीन लोकमान्य पाटील यांची तक्रार दिनांक ०४/०२/२०२१ रोजी महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे.

तथापि, सदर जागेवर सन १९९५ पासून ते सन २०१३ पर्यंत वेळोवेळी विकास नियंत्रण नियमावलीनुसार सुधारीत बांधकाम परवानग्या देण्यात आलेल्या आहेत.

स.क्र. ७२/२ या जागेवरील इमारतींना भोगवटा दाखला देण्यात आलेले असून सद्य:स्थितीत इमारती रहिवास व्याप्त आहेत.

सदर जागेवरील बांधकाम परवानगीबाबत श्री.जतीन लोकमान्य पाटील यांनी हरकत घेतली असता तत्कालीन आयुक्त यांनी दिनांक १७/०६/२०१९ रोजी सुनावणी घेऊन सदर इमारती या १९९६ पासून अस्तित्वात असल्याने व Third Party Interest Create झाल्याने प्रस्तावातून सदर जागा वगळता येणार नाही, असा निर्णय पारीत केलेला आहे.

सद्य:स्थितीत या जागेवर नव्याने कोणतेही बांधकाम सुरू नसल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जुईनगर (बेलापूर) येथील भूमिगत पाण्याची टाकीमध्ये मानवी सांगाडा सापडल्याबाबत

**(१०) ८४०४ (१८-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुईनगर (बेलापूर) रेल्वे स्टेशनच्या पश्चिम बाजूस असलेल्या भूमिगत पाण्याच्या टाकीमध्ये मानवी सांगाडा सापडल्याची घटना दिनांक २७ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पाण्याच्या टाकीतून जुईनगर, सानपाडा विभागामध्ये पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात असून जलकुंभावर नियमित कामगार व सुरक्षारक्षक तैनात असतानाही तेथील पाण्याच्या टाकीमध्ये एका व्यक्तीचा सांगाडा सापडला असल्याने जुईनगर, सानपाड्यातील नागरिकांचा पिण्याचा पाण्याचा तसेच आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भूमिगत पाण्याच्या टाकीमध्ये मानवी सांगाडा सापडल्याप्रकरणी जलकुंभावर नियमित तैनात असलेल्या कामगार व सुरक्षारक्षक यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
(२) जुईनगर येथील महिन्याभरापासून वापरात नसलेल्या पाण्याच्या टाकीची पावसाळ्यापुर्वी सफाई करताना एका व्यक्तीचा सांगाडा सापडला आहे. तत्पुर्वीच दिनांक २६/०३/२०२१ पासून जलकुंभवर आधारीत असलेल्या जुईनगर सेक्टर-२२, २३, २४ व २५ या भागास मुख्य जलवाहिनीतून थेट पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला आहे.

दिनांक १२/०४/२०२१ पासून सानपाडा सेक्टर-६, ७, ८ पार्ट आणि सेक्टर-९, १० व ११ या भागास बायपासद्वारे थेट पाणीपुरवठा करण्यात येत असल्याने येथील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला, अशी वस्तुस्थिती नाही.
(३) या ठिकाणी काम करणाऱ्या सर्वसमावेशक कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांना एक महिना कालावधीकरीता निलंबित करण्यात आले असून, मे. श्रीराज एंटरप्रायजेस यांच्या देयकातून निविदेतील अटी व शर्तीनुसार रुपये २,७४,५००/- इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

जलकुंभ संकुलाच्या कंम्पाऊंडवर १.२० मी. ऊंचीचे काटेरी कुंपण बसविणेच्या कामासाठी निविदा मागविण्यात आली असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोरीवली (प) येथील भगवती रुग्णालयातील अनागोंदी कारभाराबाबत

**(११) ८४१० (११-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली(प) येथील भगवती रुग्णालयात प्राणवायू (ऑक्सिजन) पुरवठ्याबाबत, विविध वैद्यकीय साधनसामुग्रीच्या वापराबाबत तसेच रुग्णालयातील विविध विभागात तज्ज्ञ डॉक्टरांच्या नियुक्त्यांबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कोणतेही प्रभावी नियोजन केले नसल्याने त्याचा त्रास कोरोना रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना सहन करावा लागत असल्याची बाब दिनांक १४ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भगवती रुग्णालयात 'कोरोना प्रतिबंधक लसीकरण' मोहिम राबविताना सुरक्षारक्षक व कंत्राटी कामगार यांच्या माध्यमातून या रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी स्वत:चा आर्थिक फायदा करून घेत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार भगवती रूग्णालयात अनागोंदी कारभार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०९-२०२१) :** (१) बोरीवली(प.) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भगवती रुग्णालय येथे (एन.टी.सी. इमारत) कोविड-१९ रुग्णांकरीता एकूण ६९ रुग्णशय्या उपलब्ध आहेत.

तसेच, कोविड-१९ रुग्णांच्या उपचाराकरीता आवश्यक साधन सामुग्री सदर रुग्णालयात उपलब्ध आहे.

दिनांक १४ मे, २०२१ रोजी सदर रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या ३३ रुग्णांकरीता आवश्यक प्राणवायुचा (ऑक्सिजन) पुरेसा साठा उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

सदर रुग्णालयातील विविध विभागात कोविड-१९ रुग्णांच्या उपचाराकरीता तज्ज्ञ डॉक्टरांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.
(२) कोरोना लसीकरणाच्या कामासाठी आवश्यकतेनुसार कंत्राटी पध्दतीने घेण्यात आलेल्या बहुउद्देशीय कामगारांमधून लसीकरण विभागात कामगार देण्यात आले आहेत.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागातून सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्ह्यातील उपसा विहिरीत वाघाच्या तीन बछड्यांचा बुडून मृत्यू झाल्याबाबत

**(१२) ८४१३ (११-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वन खात्याच्या दुर्लक्षामुळे भंडारा जिल्ह्यातील वनक्षेत्रात एकाच दिवशी वाघाचे तीन बछडे मृतावस्थेत आढळल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच जिल्ह्यातील एका कालव्यानजीक असलेल्या उपसा विहिरीत वाघाच्या दोन बछड्यांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे तसेच उपचारासाठी जेरबंद केलेल्या बछड्यांची योग्य तपासणी होण्यापूर्वीच पवनी येथील वनक्षेत्रात सोडल्याने उक्त दिड महिन्याच्या बछड्याचा दोन दिवसात मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भंडारा वनक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी वन खात्यावर योग्य देखरेख, दखल घेत नसल्याकारणाने वाघांची संख्या कमी होत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वनक्षेत्रातील जनावरांच्या देखरेखीकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन जनावरांची योग्य ती काळजी घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१४-०९-२०२१) :** (१) व (२) दिनांक ११/०५/२०२१ रोजी रात्री अवकाळी पाऊस व गारपीठीमुळे जंगलातील वाहून येणारे पाणी टेकेपार उपसा सिंचन प्रकल्पाच्या मुख्य कालव्याच्या सायफन विहिरीत घुसल्याने २ बछड्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक १२/०५/२०२१ रोजी निदर्शनास आली आहे. सदर दोन्ही बछड्यांचा मृत्यू Asphyxia मुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमूद करण्यात आले आहे.

तसेच पवनी वनपरिक्षेत्रातील गुडेगांव नियतक्षेत्रात वाघीणीपासून दुरावल्याने अशक्तपणा आल्यामुळे एका बछड्याचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आली आहे. सदर बछड्याचा मृत्यू Dehydration व Starvation मुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालात नमुद करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेट्रो-३ च्या कारशेडसाठी आरेतील वृक्षतोडीला विरोध करणाऱ्या आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याबाबत

**(१३) ८४२१ (१४-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रो-३ च्या कारशेडसाठी आरेतील झाडे कापण्यात येत असताना पर्यावरणप्रेमी तरुणांनी उत्स्फूर्तपणे पुकारलेल्या आंदोलनातून २९ जणांना अटक करुन त्याच्यावर माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हे दाखल करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरेमधील कारशेड रद्द करुन आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची घोषणा माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्र्यांनी केली होती, याबाबत घोषणा करुन एक वर्ष होऊनही आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्यात आलेले नसल्याने शिक्षण व नोकरीनिमित्त परदेशी प्रवास करणाऱ्यांना अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२०-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) आरे आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत शासनाने दिनांक ०२/१२/२०१९ च्या शासन निर्णयानुसार अपर मुख्य सचिव(गृह) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) आरे मेट्रो कारशेड आंदोलनात एकूण ५ खटले दाखल करण्यात आले होते, त्यापैकी ३ खटले शासनाने मागे घेण्यास मान्यता दिली आहे. १ खटला मा.न्यायालयाने "अ" वर्ग समरी मंजूर केला आहे. उर्वरित १ खटला मा.न्यायालयात "क" वर्ग समरी करीता सादर करण्यात आला आहे. अशा प्रकारे आरे मेट्रो कारशेड आंदोलनातील सर्व खटल्यांवर शासनाकडून कार्यवाही करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तानसा अभयारण्यात सोडण्यात आलेल्या चितळ प्रजातीच्या हरणे गायब झाल्याबाबत

**(१४) ८४५४ (११-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तानसा अभयारण्यात सोडण्यात आलेले चितळ प्रजातीचे २१ हरणे अचानक बेपत्ता झाल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण येथील नेव्ही कॅम्पमधील बंदिस्त हरणांच्या कळपाना मुक्त संचार करता यावा याकरीता तानसा अभयारण्यात या २१ हरणांच्या कळपाना सोडण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर २१ हरणांचा कळप अचानक बेपत्ता झाल्यामुळे त्यांचा शोध घेण्यासाठी वन विभागाने ड्रोन व ट्रॅप कॅमेऱ्याच्या सहाय्याने शोध मोहिम सुरु केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त शोध मोहिमेद्वारे हरणांच्या कळपाचा शोध लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच हरणे गायब होण्यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१४-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) नेचर पार्क, नेव्हल स्टेशन, ऊरण, कारंजा, जि.रायगड येथील ४५ चितळांना सन २०१६ ते २०१८ दरम्यान तानसा अभयारण्यात निसर्गमुक्त करण्यात आले आहे, हे खरे आहे.
(३) व (४) माहे एप्रिल, २०२१ मध्ये तानसा अभयारण्याच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने करण्यात आलेल्या ड्रोन सर्वेक्षणामध्ये वैतरणा वनपरिक्षेत्र व आजुबाजूच्या परिसरात निसर्गमुक्त करण्यात आलेली चितळे आढळून आले नाहीत. परंतु वन विभागातील कर्मचाऱ्यांच्या गस्ती दरम्यान व ग्रामस्थांशी झालेल्या संवादातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे चितळांचे अस्तित्व दिसून आले आहे तसेच तानसा अभयारण्याचा विस्तार पहाता २१ चितळे अचानक बेपत्ता झाली असे म्हणणे योग्य होणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील समुद्रकिनारी अवैधरित्या रेती उत्खनन सुरु असल्याबाबत

**(१५) ८४६० (२१-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील समुद्रकिनारी रात्रीच्यावेळी सर्रासपणे अवैधरित्या रेती उत्खनन सुरु असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोनातील ब्रेक द चेन या मोहिमेद्वारे विनाकारण बाहेर फिरणाऱ्यांसाठी मनाई आदेश लागू असताना आगर, नरपड, चिखले, घोलवड आदि किनाऱ्यावरुन मोठ्या प्रमाणात रेती चोरी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समुद्रकिनारी व्यायामाला जाणाऱ्या नागरिक व पर्यटकांवर पोलिसांकडून लॉकडाऊनचा बडगा दाखवून मज्जाव केला जात आहे परंतु या रेतीचोरांकडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रेती उत्खनन करणाऱ्यांवर तसेच रेती चोरांना पाठिशी घालणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांचे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१३-१०-२०२१) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील प्रयोगशाळा सहाय्यकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) ८४७७ (१८-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये कोरोना संसर्गावर नियंत्रण मिळविण्याकरीता अधिकाधिक चाचण्या करणे गरजेचे असताना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयामध्ये प्रयोगशाळा सहाय्यकांची सुमारे ६० टक्के पदे रिक्त असल्याची बाब दिनांक १ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील प्रयोगशाळा सहाय्यकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०९-२०२१) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक या संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील ५३ पदांपैकी ११ पदे व सरळसेवेच्या कोट्यातील ५४ पदे अशी एकूण १०७ पदांपैकी ६५ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) सदर रिक्त पदांपैकी पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने बिंदुनामावलीत बदल करुन पदोन्नतीचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, सरळसेवेची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करतांना एसईबीसी व ईडब्ल्यूएस आरक्षणामध्ये वारंवार बदल होत असल्याने बिंदूनामावली नोंदवहीमध्ये बदल करुन सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश प्राप्त झाले आहेत. तथापि, सरळसेवेच्या आरक्षणाबाबत सुधारीत परिपत्रक अद्यापि प्राप्त झालेले नाही. यास्तव सदर परिपत्रक प्राप्त होताच सुधारीत आरक्षणानुसार पदे सरळसेवेतील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## कल्याण तालुक्यातील रायते ते टिटवाळ्या दरम्यानच्या जंगलामध्ये दोन मोर मृतावस्थेत आढळल्याबाबत

**(१७) ८५१८ (१३-०७-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण तालुक्यातील रायते ते टिटवाळा दरम्यानच्या जंगलामध्ये माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान दोन मोर मृतावस्थेत आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जंगलात सापळा रचून शिकार करण्याचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१४-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रस्तुत प्रकरणी वन गुन्हा नोंदविण्यात आला असून पूढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई जवळील अरबी समुद्रात उभारावयाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाबाबत

**(१८) ८५६२ (१८-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४६५१८ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई जवळील अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचा दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी तत्कालीन शासनाने घेतलेल्या निर्णयान्वये सदर प्रकल्पाचे मा.पंतप्रधानांच्या हस्ते दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी जलपूजन करण्यात आले असून स्मारकाच्या कामासाठी जवळजवळ सर्व परवानग्या प्राप्त झालेल्या आहेत, तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयातील विशेष अनुमती याचिका क्र. SLP ३१९९७/२०१८ प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक ११ जानेवारी, २०१९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे उक्त काम सध्या स्थगित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामाकरीता जीएसटी वगळून अंदाजित खर्च रुपये २५८१ कोटी गृहीत धरण्यात आले असून सद्या कामास विलंब होत असल्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात आता फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त स्मारकाच्या कामासाठी एकूण किती खर्च येणे अपेक्षित आहे व त्यापैकी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे व उर्वरित निधी केव्हा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, तसेच स्मारकाचे काम ३६ महिन्यात पूर्ण करण्याचे शासनामार्फत नियोजित करण्यात आल्यामुळे स्मारकाच्या कामाबाबतची सद्य:स्थिती काय आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच उक्त प्रकरणी दाखल असलेले न्यायालयीन प्रकरणे तात्काळ मार्गी लावून स्मारकासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या व इतर सर्व तांत्रिक बाबींची पुर्तता करुन शासनस्तरावरून कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२१-०९-२०२१) :** (१) होय.

(२) अद्याप अशी बाब निर्दशनास आलेली नाही.

(३) व (४) शासनामार्फत वेळोवेळी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. (सन २०२१-२०२२ साठी रुपये १००.०० कोटी). सध्या काम बंद ठेवण्याअनुषंगाने कोर्टाचे निर्देश असल्याने काम बंद आहे. न्यायालयीन प्रकरणांमध्ये COVID-१९ च्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने या प्रकरणी सुनावणीची तारीख निश्चित केली नाही.

(५) प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील तळे व विहिरींना कुंपन घालण्याबाबत

**(१९) ८६२९ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील सातारा, देवळाई, गांधेली, बाळापूर नक्षत्रवाडी, कांचनवाडी परिसरातील तळे व विहिरींना कुपन नसल्याने अपघात होत असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे एप्रिल, २०२० ते एप्रिल, २०२१ या दरम्यान सातारा, देवळाई, गांधेली, बाळापूर, वाल्मि, नक्षत्रवाडी तसेच आसपासच्या विहिरी, तलावात १०० हून अधिक जणांचा मृत्यू झाल्याचे अग्निशमन विभागाच्या नोंदीवरुन निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औरंगाबाद जिल्ह्यातील तळे व विहिरींना कुंपन घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१४-१०-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) माहे एप्रिल, २०२० ते एप्रिल, २०२१ दरम्यान एकूण १४ जणांचा मृत्यू झाल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात नोंद आहे.
(३) तळे व विहिरींना कुंपण घालण्यासाठी रोजगार हमी योजना विभागांतर्गत कोणतीही योजना नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कडेगाव व खानापूर (जि.सांगली) तालुक्यात अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत

**(२०) ८६७३ (२१-०६-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडेगाव व खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील येरळा नदीपात्रातून वाळू माफिया अवैधरित्या वाळू उपसा करुन ट्रॅक्टर, जेसीबी, डंपर व यंत्राच्या सहाय्याने वाळूची वाहतूक केली जात असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळू माफियांवर कारवाई करुन अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१३-१०-२०२१) :** (१) व (२) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी तालुकास्तरावर भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत कडेगाव तालुक्यांमध्ये वाळूच्या अवैध वाहतूकीच्या ८ प्रकरणी तसेच वाळूचा अवैध साठ्याच्या ३ प्रकरणी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच खानापूर तालुक्यामध्ये मे, २०२१ व त्यादरम्यान वाळूच्या अवैध वाहतूकीच्या २ प्रकरणी व वाळूच्या अवैध साठ्याच्या ५ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आर्णी, घाटंजी व केळापूर (जि.यवतमाळ) तालुक्यात रोजगार हमी योजनेच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२१) ८७६५ (१४-०६-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्णी, घाटंजी व केळापूर (जि.यवतमाळ) तालुक्यात माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान रोजगार हमी योजनेंतर्गत झालेल्या कामांमध्ये वाढीव खर्च करुन व मजूरांना किमान वेतन न देता कंत्राटदार व ग्रामपंचायतीने संगनमत करुन निधीचा गैरव्यवहार केल्याचे सामाजिक अंकेक्षण (Social Audit) मध्ये निदर्शनास येवूनही सदरहू गैरव्यवहाराच्या चौकशीचे आदेश अद्याप दिले नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार सामाजिक अंकेक्षणमध्ये दोषी आढळलेल्या ६८ ग्रामपंचायतींवर व सदर कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१८-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिव्हील लाईन, वर्धा येथील प्रशासकीय इमारतीच्या दस्तऐवजांची सुरक्षा करण्याबाबत

**(२२) ८७७० (१५-०७-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा येथील सिव्हील लाईन परिसरातल्या प्रशासकीय इमारतीतील तिसऱ्या माळ्यावरील रेकार्ड रुममध्ये ५० वर्षापासून जतन केलेले शेतीचे खसरे, प्रकल्पाग्रस्ताचे दस्ताऐवज, मृत्यूच्या नोंदी या सारखे दस्तऐवजांची योग्य सुरक्षा ठेवण्यासाठी असणारे यंत्र नादुरुस्त असल्याचे दिनांक १० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रशासकीय इमारतीच्या दस्तऐवजांच्या सुरक्षेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१३-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

वर्धा येथील सिव्हील लाईन परिसरातल्या प्रशासकीय इमारतीतील तिसऱ्या माळयावरील रेकॉर्ड रुममधील दस्ताऐवज सुरक्षित ठेवण्यासाठी असे कुठलेही यंत्र शाखेत उपलब्ध नाही. तेव्हा यंत्र नादुरुस्त असल्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.
(२) प्रश्नच उद्‌भवत नाही.
(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## यवतमाळ येथील दिग्रस ते दारवा राष्ट्रीय महामार्गाचे काम संथगतीने सुरू असल्याबाबत

**(२३) ८७७५ (१५-०७-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस ते दारव्हा राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्याचे काम कंत्राटदार संथ गतीने करीत असल्यामुळे गत तीन-चार वर्षांपासून सदर रस्त्याचे काम प्रलंबित असून अनेक अपघात होत असल्याची बाब माहे मे, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर रस्त्याचे काम जलद गतीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच सदर कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांवर व संबंधित कन्ट्रक्शन कंपनीवर/कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१६-०९-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

कोविड-१९ मुळे सदर कामाच्या गतीवर परिणाम झाला आहे. परंतु त्यामुळे अपघात होत असल्याची बाब मे, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आलेली नाही.

(२) सदर प्रकल्पाच्या मूळ मंजूर वावामध्ये बदल होत गेल्याने केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक मंत्रालयाकडून मे २०१९ दरम्यान कामाच्या अंतिम वावास मान्यता प्राप्त होऊन दिनांक ३१/१२/२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, दरम्यानच्या काळात कोविड-१९ च्या पहिल्या व दुसऱ्या लाटेमध्ये शासनाच्या विविध निर्बंधामुळे अपुऱ्या मनुष्यबळाअभावी प्रकल्पाच्या प्रगतीवर परिणाम झाला. त्यानंतर रस्ते वाहतूक मंत्रालयाकडून वेळोवेळी घेतलेल्या आढावा बैठकींमध्ये उपरोक्त काम दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असून आजमितीस सुमारे ८५.४८% काम पूर्ण झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) कोविड-१९ मुळे कामास विलंब झाला आहे. परंतु सद्य:स्थितीत सुमारे ८५.४८% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम चालू आहे.

---

## कुटकी (ता.सेलू, जि.वर्धा) गावांतील शेतकरी शासनाच्या महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(२४) ८८२८ (१६-०६-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुटकी (ता.सेलू, जि.वर्धा) येथील शेतकरी श्री.रामराम राऊत यांनी सन २०१६ मध्ये स्टेट बॅक ऑफ इंडिया शाखेकडून ५२,०००/- रूपये पीक कर्ज घेतले ते शासनाच्या महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेस पात्र असतानाही श्री.राऊत व त्यांच्यासारखे अनेक शेतकरी सदर कर्ज मुक्ती लाभापासून अद्यापही वंचित असल्याचे दिनांक ८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कुटकी येथील शेतकऱ्यांना महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेंतर्गत कर्ज मुक्तीचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा याद‍ृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१४-१०-२०२१) :** (१) नाही.

श्री.रामराव राऊत यांनी भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा सेलू कडून दिनांक २३/०५/२०१७ ला रुपये ५१,१००/- इतक्या पिककर्जाची उचल केली होती. सदर पीक कर्ज दिनांक ३०/०९/२०१९ ला थकीत असल्याने श्री.राऊत यांची माहिती महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ च्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली. श्री.राऊत यांच्या कर्जखात्यात एनपीए संबंधी त्रुटी आढळून आल्याने त्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी हे खाते रिजेक्ट करण्यात आले. सद्य:स्थितीत महात्मा जोतिराव फुले शेतकरी

कर्जमुक्ती योजना २०१९ या योजनेचे पोर्टल बंद असून पोर्टलवर खाते अपलोड करण्याची प्रक्रिया सुरु झाल्यानंतरच श्री.राऊत यांचे खाते रिअपलोड केले जाईल. त्यानंतर श्री.राऊत यांचे खाते निकषांनुसार पात्र असल्यास त्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात येईल.

(२) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ या योजनेंतर्गत वर्धा जिल्ह्यातील ५९,०७२ कर्जखाती अपलोड करण्यात आली आहे. त्यापैकी ५४,४२८ विशिष्ट क्रमांकासह कर्ज खात्याच्या याद्या प्राप्त झालेल्या असून ५३,०५४ शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण झालेले आहे. ५३,०५४ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेले असून ५१,९१४ शेतकऱ्यांना रुपये ४५९.२६ कोटीचा लाभ देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेतील मृत सफाई कामगारांच्या वारसांना आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत

**(२५) ८८६० (१८-०६-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ५२ सफाई कामगारांचा कोरोना काळात मृत्यू झाला असून मृत कामगारांच्या वारसांना रुपये ५० लाख इतके आर्थिक सहाय्य देणार असल्याचे शासनाने घोषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घोषणा करुन एक वर्ष उलटूनही अद्यापपर्यंत केवळ १४ सफाई कामगारांच्या वारसांना महापालिकेकडून आर्थिक सहाय्य करण्यात आले असून मृत ५२ सफाई कामगारांपैकी केवळ १७ सफाई कामगारांच्या वारसांना पी.टी. केस देण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सफाई कामगारांच्या वारसांना आर्थिक सहाय्य व पी.टी. केससाठी वारंवार महापालिकेत फेऱ्या मारावे लागत असून महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून उक्त प्रकरणी खूपच दिरंगाई होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सफाई कामगारांच्या वारसांना तातडीने आर्थिक सहाय्य देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०९-२०२१)** : (१) कोरोना काळात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील सफाई कामगारांच्या विविध संवर्गातील ४५ कर्मचारी व आरोग्य विभागातील ८ सफाईगार अशा एकूण ५३ कर्मचाऱ्यांच्या (कंत्राटी कर्मचाऱ्यांसह) मृत्य झाला आहे.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत, कोविड-१९ च्या रुग्णांची प्रत्यक्ष सेवा करणाऱ्या व त्यांच्या प्रत्यक्ष संपर्कात आलेल्या तसेच कोविड-१९ मुळे मृत्यू पावलेल्या आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना रुपये ५० लाख विमा योजनेचा लाभ देण्याबाबतचे आदेश केंद्र शासनाकडून पारित करण्यात आले आहेत.

(२), (३) व (४) सफाई कामगार प्रवर्गातील एकूण ५३ कर्मचाऱ्यांच्या (कंत्राटी कर्मचाऱ्यांसह) दाव्यांपैकी ४८ दावे केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत नियुक्त केलेल्या संचालक आरोग्य सेवा, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आले. त्यापैकी,

- ६ दावे केंद्र शासनामार्फत मंजूर करण्यात आले आहेत.
- केंद्र शासनाने नाकारलेल्या व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सानुग्रह योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या २८ दाव्यांपैकी ११ दावे महानगरपालिकेमार्फत मंजूर करण्यात आले आहेत व १७ दाव्यांवर कार्यवाही सुरु आहे.
- केंद्र शासनाकडे १३ दावे प्रलंबित आहेत.
- १ दावा अपात्र ठरविण्यात आला आहे.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील कोविड-१९ मुळे मृत्यू झालेल्या ३६ कामगारांपैकी २४ कामगारांच्या पात्र वारसांना पी.टी. केस देण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील भीमा नदी पात्रातून अवैध वाळू उपसा सुरु असल्याबाबत

**(२६) ८८९५ (२१-०६-२०२१) श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील भीमा नदीच्या पात्रातून अवैध वाळू उपसा सुरु असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्ह्यातील विविध समाजसेवक, समाजसेवी संघटना व पर्यावरण प्रेमी संस्था व स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेमार्फत स्थानिक प्रशासनाकडे वारंवार तक्रार करुनही वाळू माफिया व संबंधित अधिकारी यांचे आर्थिक संगनमत असल्याने याकडे स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात वाळू उपसा होऊन नदीचे पात्र धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाळू माफिया, ठेकेदार व प्रशासकीय दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन वाळू उपसा रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१३-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पंढरपूर शहर व तालुक्यातील भीमा नदीच्या पात्रातून वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरीता महसूल व पोलीस प्रशासनामार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते. त्यानुसार माहे मार्च, २०२१

ते मे,२०२१ या कालावधीत पंढरपूर शहर व तालुक्यात वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणी ६९ गुन्हे दाखल करण्यात आलेले असून त्यामध्ये २ जेसीबी, ६८ वाहने, १ बैलगाडी, १ लाकडी होडी आणि ३३ ब्रास वाळू जप्त करण्यात आली आहे. या संपूर्ण सामग्री व वाळूची एकूण किंमत रुपये २,१२,७१,०००/- इतकी आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरातील सातारा देवळाई परिसरात महानगरपालिकेच्या शाळा सुरु करण्याबाबत

**(२७) ८९०९ (११-०६-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील सातारा, देवळाई ह्या ९० हजार ते १ लाखापर्यंत लोकसंख्या असलेल्या परिसरात मजुर, कामगार व मध्यमवर्गीय कुटुंब राहत असूनही सदर परिसरात महानगरपालिकेच्या प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातारा देवळाई मूळ गावात जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत, परंतु, सातारा-देवळाई ते उक्त परिसराचे अंतर ४ ते ५ कि.मी. असल्याने लहान मुलांना ऐवढया दुर ये-जा करणे शक्य नसल्याने उक्त परिसरातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महानगरपालिका प्रशासनाने सातारा-देवळाई परिसरात किमान ५ प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०९-२०२१) :** (१) व (२) औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात सातारा, देवळाई या भागाचा समावेश दिनांक २९/०५/२०१९ च्या शासन अधिसूचने अन्वये करण्यात आला आहे

सातारा देवळाई हा भाग नव्याने औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत समाविष्ट करण्यापूर्वी जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडून सातारा गाव येथे चालू केलेली प्राथमिक शाळा व पूर्व प्राथमिक वर्ग (अंगणवाडी) सद्य:स्थितीत सुरु आहे.

त्यानुसार देवळाई गांव येथील म्हाडा कॉलनी येथे सध्या महानगरपालिकेमार्फत एक पूर्व प्राथमिक वर्ग व प्राथमिक वर्ग सुरु केलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३) औरंगाबाद महानगरपालिकेत सातारा, देवळाई हा भाग समाविष्ट झाल्यानंतर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून या भागात शाळा सुरु करण्याबाबत सर्वेक्षण करण्यात आले आहे.

तसेच नविन ४ प्राथमिक/ माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी विद्यार्थी सर्वेक्षण करणे, शाळा इमारत व इतर भौतिक सुविधांच्या उपलब्धतेनुसार पुढील वर्ग महानगरपालिका सुरु करणार असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२८) ८९१२ (१५-०७-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेतील एकूण प्रभागाची संख्या ११५ तर शहराची लोकसंख्या १२ लाख असून सदर महानगरपालिकेमध्ये गत २० वर्षापासून सेवानिवृत्तीमुळे कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या कमी होत असल्याने उर्वरित कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनपाच्या सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.१२६ व १२६४ नुसार विविध संवर्गातील नविन पदे निमिर्तीस मान्यता देवून सदर प्रस्ताव दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजी शासनाकडे पाठविला होता व त्यानुसार दिनांक १५ फेब्रवारी, २०२० रोजीच्या शासन आदेशानुसार सध्याच्या मंजूर ४७९९ पदापैकी ३६ पदे व्यपगत करुन ३५ विविध विभागातील, विविध सवंर्गातील ९५३ पदांमध्ये वाढ करुन एकून ५७१६ पदाच्या आकृतिबंधास मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार मनपाच्या आरोग्य विभागासह विविध विभागातील कर्मचाऱ्यांची कमतरता लक्षात घेता मंजूर पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) औरंगाबाद महानगरपालिकेतील विविध विभागांकरीता विविध संवर्गातील पदे निर्माण करुन एकूण ५७१६ पदांच्या आकृतीबंधास शासन निर्णय दिनांक १५/०२/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

महानगरपालिकेतील पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरात महापालिकेचे स्पेशालिटी हॉस्पिटल व स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय उभारण्याबाबत

**(२९) ८९२८ (१८-०६-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ६४७१ ला दिनांक १० मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात महापालिकेचे एकही स्पेशालिटी हॉस्पिटल व स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय नसून, सध्या अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेच्या आरोग्य यंत्रणेमार्फत शहरातील रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत असल्यामुळे रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी मनपा संचलित स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय नसल्याने औरंगाबाद विभागातील रुग्णांना मुंबई/पुणे येथे उपचारासाठी जावे लागत असल्याने त्यांना अधिकचा आर्थिकभार सहन करावा लागत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, औरंगाबाद शहरात चिखलठाणा औद्योगिक क्षेत्रात कोविड-१९ च्या रुग्णांसाठी कार्यान्वित असलेले ३०० खाटांचे रुग्णालय कोविडची साथ आटोक्यात आल्यानंतर सदर रुग्णालय हे पुढे मराठवाडा विभागाकरीता साथरोग व संसर्गजन्य आजाराकरीता उभारण्याचे औरंगाबाद महानगरपालिकेचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर नियोजनान्वये औरंगाबाद शहरात मनपाचे स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०९-२०२१)** : (१) व (२) औरंगाबाद महानगरपालिकेचे स्पेशालिटी हॉस्पिटल व स्वतंत्र संसर्गजन्य रुग्णालय कार्यरत नसून, सध्या अस्तित्वात असलेल्या महानगरपालिकेच्या आरोग्य यंत्रणेमार्फत शहरातील रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.
(३) व (४) औरंगाबाद शहरात चिखलठाणा औद्योगिक क्षेत्रात कोविड-१९ च्या रुग्णांसाठी ३०० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित असून, कोविडची साथ आटोक्यात आल्यानंतर सदर रुग्णालय हे पुढे मराठवाडा विभागाकरीता साथरोग व संसर्गजन्य आजाराकरीता सुसज्ज असे रुग्णालय उभारण्याचे नियोजन असल्याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.

औरंगाबाद येथे संसर्गजन्य रुग्णालय उभारण्याबाबतच्या प्रस्तावास महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने दिनांक २/०६/२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिलेली असून, त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत असल्याचे औरंगाबाद महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई महानगरपालिका व मुंबई महापालिकेमार्फत शालेय वस्तु/साहित्य खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३०) ८९३८ (१८-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या शैक्षणिक साहित्य खरेदी मध्येही काही कंपन्या व महानगरपालिकेची अधिकारी यांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात येत असल्याचा संशय व्यक्त होत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मुंबई महापालिकेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना दरवर्षी २७ शालेय वस्तूंचे वाटप केले जाते मात्र, माहे मार्च, २०२१ पासून करोनाविषयक निर्बंध कडक करुन लॉकडाऊन करण्यात आल्यामुळे शाळा कधी सुरु होतील याबाबत अंदाज नसताना महापालिकेने विद्यार्थ्यांसाठी चामड्याचे तसेच कॅनव्हास बूट आणि मोजे खरेदीची प्रकिया सुरु करुन तब्बल ४० कोटींच्या निविदा मागविण्यात आल्याचे दिनांक २० एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच मुंबई महानगरपालिका प्रशासन

शाळा बंद असतानाही बूट व मोज्यांच्या खरेदीची घाई का करित आहे याबाबत चौकशी करुन सदर निविदा प्रक्रिया लवकरात लवकर रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व विद्यार्थ्यांना नियोजन विभागाच्या दिनांक ०५/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार DBT योजनेंतर्गत शालेय साहित्याची रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात येते.
(२) व (३) मुंबई महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना दोन वर्षातून एकदा क्रीडा गणवेश व कॅनव्हास शुज देण्यात येतात.

सन २०२०-२१ मध्ये कोविड-१९ नियंत्रणात आला त्यावेळी शाळा सुरू होतील अशी परिस्थिती निर्माण झाल्याने साहित्यांची निविदा मागविण्यात आली होती. तथापि, सदरची निविदा रद्द करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबरनाथ नगरपालिका व ठाणे महानगरपालिका क्षेत्रात रेमडीसिविर इंजेक्शनचा गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(३१) ८९४८ (११-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ नगरपालिकेच्या कोविड रुग्णालयात माहे मे, २०२१ च्या पहिल्या पंधरवड्यात रेमडीसिविर इंजेक्शनचा गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले असून सदर गैरव्यवहार हा रुग्णालयातील रुग्णवाहिका चालकानेच केल्याचे सामोरे आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुलुंडमधील एका नर्सिंग होममध्ये सहायक म्हणून काम करणाऱ्या कर्मचाऱ्याने ठाणे महानगरपालिका कोरोना केंद्रातून रेमडीसिविर इंजेक्शनचा विक्रीसाठी नसलेला साठा रुग्णांच्या नातेवाईकांना पैसे आकारुन विकल्याचा प्रकार दिनांक ११ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात काम करणारे कर्मचारी रेमडीसिविर इंजेक्शनचा गैरव्यवहार करीत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विक्रीसाठी नसलेला रेमडीसिविर इंजेक्शनचा साठा गैरमार्गाने विकणाऱ्या दोषींवर कारवाई करुन रेमडीसिविर इंजेक्शनचा गैरव्यवहार रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०९-२०२१) :** (१) अशा आशयाच्या प्राप्त तक्रारीस अनुसरुन नगरपरिषदेने पोलीस स्टेशन अंबरनाथ येथे गुन्हा दाखल केला.

त्यानुसार ताब्यात घेतलेला वाहनचालक यांच्याकडून हस्तगत केलेली औषधाची बॅच नगरपरिषदेकडे कधीच आलेली नव्हती. नगरपरिषदेच्या साठा रजिस्टरमध्ये पडताळणी केली असता, याची पृष्टी झाली असून रेमेडिसीवीर बाबत कोणताही गैरव्यवहार नगरपरिषदेमार्फत झाला नसल्याचे अंबरनाथ नगरपरिषदेने कळविले आहे.

(२) विक्रीसाठी नसलेला रेमडीसिविर इंजेक्शनचा साठा रुग्णांच्या नातेवाईकांना पैसे आकारुन विकताना मे. ओमसाई आरोग्य केअर प्रा.लि. मार्फत नेमणुक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याला खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर व अन्न व औषध प्रशासन यांनी रंगेहाथ पकडून, वागळे इस्टेट पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची बाब खंडणी विरोधी पथक यांच्यामार्फत ठाणे महानगरपालिकेच्या निदर्शसनास आली असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) अशा आशयाच्या प्राप्त तक्रारीस अनुसरुन अंबरनाथ नगरपरिषदेने पोलीस स्टेशन अंबरनाथ येथे गुन्हा दाखल केला आहे. तसेच, खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांनी परस्पर तपास करुन गुन्हा दाखल केला असल्याची बाब अनुक्रमे अंबरनाथ नगरपरिषद व ठाणे महानगरपालिका यांनी कळविली आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील सिंचन विहिर योजनेचे प्रस्ताव निकाली काढण्याबाबत

**(३२) ८९८० (१४-०६-२०२१) श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून अहिल्यादेवी सिंचन विहिर योजनेद्वारे ४९०० विहिरींपैकी २१९९ प्रस्तावांना शासनाकडून मंजूरी मिळाली असून ७८५ विहिरींची कामे सुरु तर उर्वरित १२५ विहिरींची कामे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडे वरील अर्जांच्या व्यतिरिक्त सुमारे तीन हजार प्रस्ताव प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यात अहिल्यादेवी सिंचन विहिर योजनेची कामे प्रलंबित ठेवणाऱ्या बेजबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन सिंचन विहिरींचे प्रस्ताव निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१४-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार सह कार्यक्रम अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांना दिनांक ४ मार्च, २०२१ च्या शासन निर्णयानुसार देण्यात आले आहेत. त्यानुसार विहिरीच्या कामांना मागणीनुसार प्रशासकीय मंजुरी देण्याचे कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागातील गैरव्यवहाराबाबत

**(३३) ९०३६ (११-०६-२०२१) श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार सुरु असून वरळी भागात मालमत्ता कर वसुलीत १०० कोटींचा तर संपूर्ण मुंबईत ७०० ते ८०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे मार्च, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरळी, परळ येथे मोक्याच्या जागेवर असलेल्या मिल मालकांकडून मालमत्ता करापोटी महापालिकेला कोट्यवधी रुपये येणे असते मात्र, मनपा अधिकाऱ्यांमार्फत मालमत्ता कराची देयके संबंधित जागा मालकांना पाठवताना त्यांच्या जागेचे आकारमान व मुल्य कमी करुन मालमत्ता कराची कोटयवधीची रक्कम काही लाखात दाखवून अत्यल्प कर आकारले जात असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने महापालिकेचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०९-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

वरळी व परळ भागातील मोकळ्या जागेवर विकसन होत असलेल्या मालमत्तांचे करनिर्धारण मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील प्रकरण ८ अन्वये व स्थायी समितीने मंजूर केलेल्या “भांडवली मूल्यधारित नियमावलीनुसार” व इमारत प्रस्ताव विभागाने मंजूर केलेल्या आराखड्यानुसार करण्यात येते.

तथापि, बंद पडलेल्या मिलच्या जमिनी या मोठ्या क्षेत्रफळाच्या जमिनी असून, या जमिनीवर मोठे प्रकल्प विकसित होत असतात, त्यानुसार जसजसे आराखडे मंजूर होतात, तसतसे या भूखंडाचा बांधकाम परवाना (सीसी) मंजुरीच्या दिनांकापासून भांडवली मूल्यधारित नियमावलीनुसार प्रथमत: करनिर्धारण केले जाते. असे प्रकल्प मोठे असल्याने त्यामध्ये काही वेळा चटई क्षेत्र निर्देशांक, विविध वापरातील बदल, आरक्षण इत्यादींमध्ये बदल करण्यासाठी विकासकांकडून इमारत प्रस्ताव विभागाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केले जातात. मालमत्तेत वेळोवेळी जसजसे बदल मंजूर करुन इमारत प्रस्ताव विभागाकडून आराखडे प्राप्त होतात तसतसे त्याअनुषंगाने करनिर्धारण आवश्यक ते बदल करुन सुधारीत देयके मालमत्ता धारकावर बजावून कर वसुलीची कार्यवाही केली जाते.

अशा प्रकल्पांतर्गत ज्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त होते त्यावेळेस असणारा मंजूर आराखडा हा अंतिम समजला जातो. नवीन इमारतीचे करनिर्धारण करण्यापूर्वी सदर अंतिम मंजूर आराखड्याच्या अनुषंगाने जर करनिर्धारणात काही बदल आवश्यक असतील तर करनिर्धारणात तशी सुधारणा करुन त्यानुसार कर वसुली केली जाते. सदर कर वसुली झाल्यानंतरच भोगवटा प्रमाणपत्रासाठी “ना-हरकत प्रमाणपत्र” दिले जाते. त्यानंतरच सदर भूखंडाचे करनिर्धारण बदलून नवीन इमारतीचे करनिर्धारण केले जाते. त्यामुळे महानगरपालिकेच्या महसुलाची पुरेपूर वसुली संबंधित विकासकाकडून केली जाते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत पावसाळ्यात पाणी तुंबण्याचे प्रमाण कमी करण्याकरीता उपाययोजना करणेबाबत

**(३४) ९०३९ (१८-०६-२०२१) श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका प्रशासनाने पावसाळ्यात पाणी तुंबणाऱ्या ४०५ ठिकाणांपैकी २९६ ठिकाणी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्याचा दावा केला असून उर्वरित १०९ ठिकाणी यावर्षी सुध्दा पाणी साचण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे एप्रिल, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ४०५ ठिकाणांपैकी केवळ १७१ ठिकाणांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित ठिकाणांची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईत पावसाळ्यात तुंबलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी लाखो रुपये खर्च करून मोठ्या प्रमाणात उदंचन केंद्रे उभारण्यात आली असतानाही दरवर्षी एवढ्या मोठ्या प्रमाणात पाणी तुंबण्याचे सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती आवश्यक कार्यवाही/उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०७-०९-२०२१) :** (१), (२) व (३) मुंबईची भौगोलिक रचना पाहता सर्वसाधारणपणे उच्च भरतीच्या वेळी अतिवृष्टी झाल्यास काही सखल भागात पाणी साचण्याच्या घटना घडतात ही वस्तुस्थिती आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मागील काही वर्षांपासून पडणाऱ्या पावसाच्या तीव्रतेचा व पूरपरिस्थिती ठिकाणांचा अभ्यास करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागाने मुंबई शहर व उपनगरे आजपर्यंत येथे एकूण ३८६ ठिकाणे पूरप्रवण ठिकाणे म्हणून निश्चित करण्यात आली आहेत.

सदर ३८६ पूरप्रवण ठिकाणांपैकी १७१ पूरप्रवण ठिकाणे आजपर्यंत हाताळण्यात आली आहेत. उर्वरित २१५ पूरप्रवण ठिकाणांपैकी १२५ पूरप्रवण ठिकाणे २०२१ च्या पावसाळ्यापूर्वी, २५ पूरप्रवण ठिकाणे २०२२ च्या पावसाळ्यापूर्वी व ८ पूरप्रवण ठिकाणे २०२२ च्या पावसाळ्यानंतर हाताळण्याचे नियोजन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे. तसेच १४ पूरप्रवण ठिकाणांची कामे नियोजन स्तरावर असून, ४३ पूरप्रवण ठिकाणांची कामे इतर शासकीय प्राधिकरणाशी / खाजगी आस्थापनांशी संबंधित असून याबाबत विविध शासकीय प्राधिकरणांशी समन्वय साधण्यात आला आहे.

तसेच, सन २०२१ च्या पावसाळ्यापूर्वी हाताळण्यात येणाऱ्या १२५ पूरप्रवण ठिकाणांपैकी ९८ पूरप्रवण ठिकाणी कामे पूर्ण झाली असून, २७ पूरप्रवण ठिकाणी कामे प्रगतीपथावर असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ग्रामीण रोजगार हमी देणाऱ्या मनरेगा योजनेची कामे बंद झाल्याबाबत

**(३५) ९१४७ (१५-०७-२०२१) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोविड-१९ साथीच्या दुसऱ्या लाटेमुळे राज्यातील ग्रामीण रोजगाराची हमी देणाऱ्या मनरेगा योजनेची कामे बंद पडल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था आर्थिक संकटात आली असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण रोजगार हमी देणाऱ्या मनरेगा योजनेची कामे बंद झाल्याने शेती उत्पादनावरही परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१४-१०-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) ग्रामीण भागातील कुटुंबांना मागणीप्रमाणे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत रोजगार उपलब्ध करुन देण्यात येत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून त्यांचे जिवनमान उंचावण्यासाठी समृद्धी बजेट ची संकल्पना राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील महाड-म्हाप्रळ-पंढरपूर या राज्यमार्गाच्या रूंदी करणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३६) ९२३४ (१५-०७-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : दिनांक - रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक मधील प्रश्न क्रमांक २२३४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील महाड-म्हाप्रळ-पंढरपूर या राज्यमार्ग क्रमांक १५ च्या रूंदीकरणाचे काम गत दोन वर्षापासून सुरू असून सद्य:स्थितीत सदर काम संबंधित ठेकेदाराकडून काढून घेतल्याने सदर राज्यमार्गाचे काम अनेक महिन्यापासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याच्या रूंदीकरणासाठी जोगोजागी केलेले खोदकाम, मोऱ्यांची कामे तसेच पुलांची कामे अपूर्णावस्थेत असल्यामुळे अपघातांच्या संस्थेत वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त रस्त्यांची कामे पूर्ण करण्याकरीता नवीन ठेकेदाराची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) रस्त्याच्या अपूर्ण कामामुळे अपघात झाल्यासंबंधी कोणत्याही प्रकारची लेखी स्वरुपाची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) म्हाप्रळ-महाड-पंढरपूर राज्यमार्ग क्र. १५ रस्त्यामधील आंबडवे-पाचरळ-मंडणगड-म्हाप्रळ-महाड-(राजेवाडी फाटा) -वरंध-भोर-आंदोरी-लोणंद रस्ता केंद्र शासनाच्या दिनांक ०६/०२/२०१८ च्या अधिसूचनेद्वारे राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ डी.डी. म्हणून घोषित करण्यात आला आहे.

त्यानंतर सदर राष्ट्रीय महामार्ग क्र.९६५ डीडी पैकी रायगड जिल्ह्यातील एकूण ८१.३२५ कि.मी. लांबीपैकी आंबडवे-पाचरळ-मंडणगड-म्हाप्रळ-महाड (राजेवाडी फाटा) या ५९.७२५ कि.मी. लांबीमध्ये दुपदरीकरण व काँक्रिटीकरण करण्याच्या कामासाठी कंत्राटदार मे. एम बी. पाटील कंस्ट्रक्शन कंपनी, पुणे यांची दिनांक ०६/१२/२०१८ रोजी नियुक्ती करणेत आली होती. तथापि, सदर कंत्राटदाराकडून कामाची प्रगती न राखल्याने दिनांक १४/१०/२०२० रोजी सदर निविदा विखंडीत करण्यात आली आहे व उर्वरीत कामाकरीता नव्याने निविदा प्रक्रिया हाती घेण्यात येऊन सद्य:स्थितीत कंत्राटदार मे.कोटारकी कंस्ट्रक्शन प्रा.ली.कर्नाटक यांची निविदा स्वीकृत करण्यात आली आहे व सदर कंपनीस दिनांक १३/०८/२०२१ रोजी LOA देण्यात आला आहे. त्यानुसार कंत्राटदाराकडून सुरक्षा अनामत रक्कम जमा केल्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येऊन काम हाती घेण्यात येणार आहे.

दरम्यानच्या कालावधीत सदर ५९.७२५ कि.मी. लांबीचा रस्ता सुस्थितीत ठेवण्याकरीता नवीन कंत्राटदाराची नियुक्ती होईपर्यंत मूळ कंत्राटदाराच्या जबाबदारीवर व खर्चाने (Risk and Cost) रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीचे काम करण्यात आले असून सद्य:स्थितीत सदर रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

तसेच रायगड जिल्ह्यातील एकूण ८१.३२५ कि.मी. लांबीपैकी उर्वरीत महाड (राजेवाडी जंक्शन) ते वरंध घाट या २१.६०० कि.मी.लांबीतील रस्त्याचा डांबरी पृष्ठभाग देखिल सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड महानगरपालिकेच्या हद्दीतील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(३७) ९२४३ (१५-०७-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड महानगरपालिका हद्दीतील सिटी सर्व्हे नं. ८३५२ स.नं.५२/अ (भाग) असुदल्लाबाद कैलास नगर येथे विनापरवानगी ३३२४७ चौ. मिटरचे तळमजला, पहिल्या व दुसऱ्या मजल्याचे अनधिकृत बांधकाम करण्यात आले असून सिटी सर्व्हे नं.८३४१ म.न.पा.नंबर १-१७-९००४ मध्येही अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत सहाय्यक आयुक्त, नांदेड महानगरपालिका यांनी नोटीस देवूनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्यामुळे उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालिका यांचेकडे दिनांक १७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी क्षेत्रिय कार्यालय, क्र.२ अशोक नगर यांनी अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याकरीता संबंधितांना दिनांक ३०/०९/२०२० रोजी नोटीस बजावली आहे.

तथापि, सदर नोटीसीविरुध्द अतिक्रमण धारकांनी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, नांदेड येथे दावा दाखल केला असून मा.न्यायालयाने सिटी सर्वे क्र.८३५२ व ८३४१ मधील मालमत्तेच्या वादाचे निकाल लागेपर्यंत कोणताही हस्तक्षेप करु नये. असा मनाई हुकुमाचा आदेश पारित केला आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याच्या जलधीक्षेत्रात परप्रांतिय नौकांना मासेमारी करण्यास बंदी आणण्याबाबत

**(३८) ९२४४ (२१-०६-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या जलधीक्षेत्रात परप्रांतिय नौकाद्वारे अनधिकृतपणे मासेमारी सुरु असून सिंधुदुर्ग किनारपट्टीवर सुरु असलेल्या एलईडी व पर्ससीन नेट मच्छीमारी विरोधात अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीने साखळी उपोषण केल्याचे माहे मार्च, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपोषणाच्या अनुषंगाने एलईडी व पर्ससीन नेट मच्छीमारांवर कारवाईसाठी गेलेल्या मत्स्य विभागाच्या गस्ती नौकेवर परप्रांतिय हायस्पीड ट्रॉलर्सधारकांनी हल्ला केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याच्या सागरी जलधीक्षेत्रात परप्रांतिय नौकाद्वारे होणारे अनधिकृत मासेमारीस आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत अधिनियमात आवश्यक त्या सुधारणा करण्याची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, याबाबतची सविस्तर माहिती काय आहे,

(४) असल्यास, गुजरात राज्याच्या जलधीक्षेत्रात इतर राज्यातील मच्छीमारांनी मासेमारी केल्यास रुपये एक लाख दंड व त्या दिवशी पकडलेल्या माशांच्या पाचपट दंड आकारण्यात येणारे विधेयक गुजरात विधानसभेने मंजूर केले असून राज्याच्या जलधीक्षेत्रात परप्रांतिय नौकाद्वारे अनधिकृत मासेमारी रोखण्याकरीता गुजरात विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकाप्रमाणे राज्यात मासेमारी प्रतिबंधक विधेयक मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्याच्या जलधीक्षेत्रात परप्रांतिय नौकांना मासेमारी करण्यास बंदी आणण्याबाबत तसेच एलईडी व पर्ससीन नेट मासेमारी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०८-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे

गस्ती नौकेद्वारे सिंधुदुर्ग जिल्हयातील राज्याच्या जलधी क्षेत्रात गस्त घालत असताना कर्नाटक राज्यातील मलपे येथील मासेमारी नौकानी विभागाच्या गस्ती नौकेस घेराव घालुन पाठलाग करुन धडक देण्याचा प्रयत्न केलेला होता.सदर नौकांचा क्रमांक घेऊन या नौकांवर वेंगुर्ला पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच सदर नौकांवर योग्य ती उचित कार्यवाही करण्याबाबत संचालक, मत्स्यव्यवसाय विभाग, कर्नाटक राज्य यांना कळविण्यात आलेले आहे.
(३) व (४) अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या विरुध्द कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) राज्याच्या जलधी क्षेत्रात एलईडी मासेमारीस प्रतिबंध करण्यात आलेले आहे. राज्याच्या जलधी क्षेत्रात अनधिकृत पर्ससीन व एलईडी मासेमारी नौका तसेच परराज्यातील नौका निदर्शनास आल्यास अशा अनधिकृत नौकावर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ कायद्याअंतर्गत कठोर कार्यवाही करण्यात येत आहे.

एप्रिल २०२० ते मे २०२१ पर्यंतच्या कालावधीत परराज्यातील अनधिकृत ५७ नौकांवर सागरी कायद्याअंतर्गत कठोर कार्यवाही करण्यात आलेली असून रुपये १,०६,३०,१५३/- एवढा दंड वसुल करण्यात आलेला आहे. सागरी कायद्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने मुंबई, रायगड, ठाणे-पालघर येथील तिनही गस्ती नौका एकत्रित करुन अंमलबजावणी पथक तयार करुन गोपनीय पध्दतीने दिनांक ०६ एप्रिल २०२१ ते ०९ एप्रिल २०२१ या कालावधीत मुंबई-शहर, मुंबई-उपनगर व रायगड जिल्हात एकूण ४

दिवसाचा “धडक मोहीम अभियान” राबविण्यात आलेला होता.सदर कालावधीत एकूण २३ अनधिकृत नौकांवर कार्यवाही करण्यात आलेली असून त्यामध्ये १ एलईडी नौका व ३ पर्ससीन मासेमारी नौकांचा समावेश आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील घोडजमार्गे मुखेडकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(३९) ९२४६ (१५-०७-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील घोडजमार्गे मुखेडकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्यामुळे रस्त्यामध्ये ठिकठिकाणी खड्डे पडले असून उक्त रस्त्याचे काम संथगतीने सुरु आहे तसेच रस्त्यावर खडी पसरल्यामुळे रस्त्यावरून वाहतूक करणाऱ्या नागरिकांचे अपघातही होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे काम करताना माहितीचे फलक किंवा रस्ते सुरक्षा उपाययोजनेचा अवलंब करण्यात न आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रस्त्याचे काम संथगतीने तसेच निकृष्ट दर्जाचे करुन रस्ते सुरक्षा उपाययोजनेचा अवलंब न करता काम करणाऱ्या संबंधित शासकीय अभियंत्यावर व कंत्राटदारांवर कारवाई करुन सदर रस्त्याचे काम जलदगतीने व दर्जेदार पध्दतीचे होण्याकरीता कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१७-०९-२०२१) :** (१) प्रश्नाधीन रस्ता हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत मंजूर असलेल्या लोहा - कंधार - मुखेड - एकलारा -खानापूर कि.मी. २९७/४०० ते ३७१/९०० (७४.५० कि.मी.) रस्त्याचा भाग असून त्याची लांबी

४४.२० कि.मी. आहे. यापैकी ४.४० कि.मी लांबी वनक्षेत्रातील असून २.२०० कि.मी. लांबी राष्ट्रीय महामार्गाकडे वर्ग आहे. उर्वरित ३७.६० कि.मी. लांबीपैकी ३१.५० कि.मी. लांबीतील रस्त्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित ६.१० कि.मी. लांबीतील पुलांचे काम प्रगतीपथावर असून ते पूर्ण होताच पोच मार्गासह उर्वरित लांबीतील काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सद्य:स्थितीत या काम सुरू न केलेल्या लांबीतील रस्त्यावरील खड्डे बूजवून रस्ता सुस्थितीत ठेवण्याचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरित लांबीत कंत्राटदारामार्फत खडी पसरविण्याचे काम अद्याप सुरू केलेले नसल्याने खडी पसरविण्याच्या कामामुळे अपघात होण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच, पोलीस स्थानकात अशा प्रकारची नोंद नाही. त्याचप्रमाणे प्रश्नाधीन रस्त्याचे काम गुणवत्तापूर्ण झालेले आहे. कोव्हीड -१९ साथजन्य रोग, वनजमीन इ. कारणांमुळे कामास विलंब झाला असून मुदतवाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत मजूरांच्या कामांची मजूरी थकविल्याबाबत

**(४०) ९२७७ (१४-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील विविध ठिकाणी रोजगार हमी योजनेंतर्गत गेल्या वर्षभरापासून सुरु असलेल्या कामांचे रुपये २८ कोटी इतकी मजूरीची रक्कम मजूरांना अदा करण्यात आली नसल्याचे दिनांक २२ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार हमी योजनेवरील केलेल्या कामाच्या मजुरीचे पैसे गरीब आदिवासी, कष्टकरी, कातकरी व अन्य कष्टकरी मजुरांना यावर्षीच्या होळी सणापूर्वी देण्यात यावेत अशी आग्रही मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी व कष्टकरी मजुरांनी शासनाकडे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मजूरांची थकित मजूरी त्यांना अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१४-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) केंद्र शासनाकडून विहित मुदतीत निधी उपलब्ध करुन दिला नसल्यामुळे मजुरांची मजूरी अदा करण्यात आलेली नव्हती. माहे, मार्च २०२१ अखेरपर्यंत टप्प्या-टप्प्याने सर्व निधी उपलब्ध करुन देण्यात आल्यानंतर सर्व मजूरांना EFMS प्रणालीद्वारे तात्काळ मजूरी अदा करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाफेडने कंपन्यांना बारदाने न पुरविल्यामुळे कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या बिलातून वसूल केलेली रक्कम तांदुळजा खरेदी केंद्राने शेतकऱ्यांना परत करण्याबाबत

**(४१) ९२८१ (१७-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गतवर्षी सन २०१९-२०२० या वर्षामध्ये राज्यात शासनाने खाजगी उत्पादक (प्रोडयुसर) कंपन्यांना शासनाच्या हमी भावाने तूर तसेच हरभरा पिकांचे खरेदी करण्याचे परवाने दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपन्यांना नाफेडकडून बारदाने पुरविणे गरजेचे असताना कोरोना काळामुळे बारदाने उत्पादन होत नसल्याने कंपन्यांना नाफेडकडून बारदाने पुरविण्यात आले नव्हते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तांदुळजा खरेदी केंद्रावर (ता.जि.लातूर) खाजगी कंपन्यांनी हजारो टन हरभऱ्याची खरेदी केली असून कंपन्यांनी बारदानाचे जवळपास ३८ रुपये प्रति पोते असे ४६ हजार पोत्यांचे सुमारे रुपये १७ लाख ४८ हजार रुपये एवढया रक्कमेची शेतकऱ्यांकडून बिलातून वसूली करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, असे असताना दुसरा हंगाम आला तरी नाफेडने कंपन्यांना बारदाने न पुरविल्यामुळे कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या बिलातून वसूल केलेली रक्कम अद्याप शेतकऱ्यांना मिळाली नसल्याने तांदूळजा खरेदी केंद्राने ती रक्कम शेतकऱ्यांना परत करावी अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आल्याचे दिनांक १८ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नाफेडने कंपन्यांना बारदाने न पुरविल्यामुळे कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या बिलातून वसूल केलेली रक्कम अद्याप शेतकऱ्यांना मिळाली नसल्याने तांदूळजा खरेदी केंद्राने ती रक्कम शेतकऱ्यांना परत करावी या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०६-१०-२०२१) :** (१) हंगाम २०१९-२० मध्ये नाफेडच्यावतीने हमीभावाने कडधान्य व तेलबिया खरेदीकरीता महाएफपीसी, पुणे या संस्थेला स्टेट नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले होते. सदर संस्था शेतकरी उत्पादक संस्थांमार्फत हमीभावाने खरेदीचे काम करते.

(२) सन २०२० मध्ये कोरोना विषाणूच्या महामारीमुळे देशात लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे बारदाना पुरवठ्यामध्ये अडथळे निर्माण झाले होते. तसेच पश्चिम बंगाल मधील तागाचे कमी उत्पादन व बंद तागउद्योग यामुळे

पर्यायी बारदाना वापरण्यासाठी केंद्रशासनाने निर्देश दिले होते. त्यानुसार शेतमालाची विक्री करण्यास गैरसोय होऊ नये यासाठी स्थानिक पातळीवर बारदाना उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न केला होता.

(३) हे खरे नाही. या केंद्रावर १६९३ शेतकऱ्यांकडून २३९३.९० मे.टन हरभरा (चना) खरेदी करण्यात आला असून, हमी दराने होणारी एकूण रुपये ११,६७,०३,०१५ इतकी संपूर्ण रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

(४) व (५) नाही. बारदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या बिलातून वसुल करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील वन क्षेत्रपालांच्या तदर्थ पदोन्नती नियमित करण्याबाबत

**(४२) ९३४३ (१५-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वनपाल संवर्गामधून तदर्थ पदोन्नती दिलेल्या वनक्षेत्रपाल संवर्गातील पदोन्नत्या नियमित करण्याबाबत शासनाच्या वन विभागाकडे दिनांक १२ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर सुमारे दोन वर्षात निर्णय होऊ शकलेला नसल्यामुळे यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२७-०९-२०२१) :** (१) वनक्षेत्रपाल संवर्गातील तदर्थ पदोन्नती नियमित करण्यासंदर्भात अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुय्यम संवर्ग), नागपूर यांचेकडून दिनांक २५/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सुधारीत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

(२) दिनांक २५/०६/२०२१ अन्वये प्राप्त झालेल्या सुधारीत प्रस्तावाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्णय घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महापालिकेच्या स्मार्टसिटी योजनेतून बांधण्यात येणाऱ्या सॅटीस उड्डाणपूलाबाबत

**(४३) ९४१३ (१५-०७-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे (पूर्व) येथे महानगरपालिकेच्या स्मार्ट सिटी योजनेतून सॅटीस २ उड्डाणपूलाचे काम सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उड्डाणपूलाची लांबी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सीआरझेड क्षेत्रापर्यंत असून उक्त ठिकाण हे नोटीफाईड वेटलॅण्ड (पाणथळ), मिठागर आणि सीआरझेड अंतर्गत मोडत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त उड्डाणपुलासाठी सीआरझेड, पर्यावरण विभाग तसेच इतर संबंधित विभागाच्या परवानग्या घेण्यात आल्या आहेत काय, याबाबत शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०९-२०२१) :** (१) स्मार्ट सिटी योजनेंतर्गत ठाणे (पूर्व) येथे सॅटीस २ उड्डाणपूलाचे काम सुरु आहे.
(२), (३) व (४) मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेड यांच्या अहवालानुसार, सॅटीस २ या उड्डाणपुलाचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय, कन्हैया नगर, कोपरी ठाणे (पूर्व) क्षेत्राच्या लगत असलेल्या मंजूर विशेष आर्थिक क्षेत्रातील काही भागात सुरु आहे.

विशेष आर्थिक क्षेत्राकरीता शासनाने मंजूर केलेल्या नकाशान्वये सदर जागा ही नोटीफाईड वेटलॅण्ड (पाणथळ), मिठागर आणि सीआरझेड क्षेत्रात मोडत नसल्यामुळे संबंधित विभागांची परवानगी घेण्याची आवश्यकता नाही.

---

## नवेगांवबांध-नागझिरा अभयारण्य व पिंटेझरी वन परिक्षेत्रात लागलेल्या आगीत वन कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(४४) ९५४५ (१८-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यातील नवेगांवबांध-नागझिरा अभयारण्य व पिंटेझरी वन परिक्षेत्रात दिनांक ८ एप्रिल, २०२१ रोजी अज्ञात इसमाने लावलेली आग (वणवा) विझवितांना कर्तव्यावर असलेले ४ वन कर्मचारी मृत्यूमुखी पडल्याचे व ४ ते ५ वन मजुर गंभीररित्या जखमी झाल्याची दुर्देवी घटना घडल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वणव्यात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना शासनामार्फत रुपये ५ लाखाचे अर्थसहाय्य देऊन जखमींना शासकीय खर्चात उपचार करण्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनामार्फत मृत रुग्णांच्या कुटुंबियांना प्रत्यक्षात अर्थसहाय्याची रक्कम केव्हा अदा करण्यात आली आहे व त्यापैकी आतापर्यंत किती वन कर्मचाऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्यात आली आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१४-०९-२०२१) :** (१) नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील नागझिरा अभयारण्य येथे दिनांक ०८/०४/२०२१ रोजी अज्ञात इसमाने लावलेली आग विझविताना ३ हंगामी वनमजुर मृत झाले आहेत. तसेच २ हंगामी वनमजुर गंभीर जखमी झाले होते त्यापैकी १ हंगामी वनमजूराचा उपचारा दरम्यान दिनांक १७/०५/२०२१ रोजी मृत्यू झाला आहे व उर्वरित १ हंगामी वन मजूरास उपचार करुन रुग्णालयातून सोडण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) आग विझविताना घटनास्थळी मृत्यूमुखी पडलेल्या हंगामी वनमजुरांच्या वारसाच्या खात्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून रुपये १.०० लाख जमा करण्यात आले आहेत. उर्वरित रुपये ४.०० लाख राज्य आपत्ती निवारण निधीमधून देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी संघटना, स्थानिक आमदार, WTI, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रतिष्ठान व इतर संस्थांच्या मदतीने उपलब्ध झालेल्या निधीमधून ३ मृत व्यक्तीच्या वारसास प्रत्येकी रुपये ५.०० लाख असे एकूण प्रत्येकी रुपये ६.०० लाख देण्यात आले आहेत.

तसेच वनपरिक्षेत्र अधिकारी संघटना, WTI, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रतिष्ठान व इतर संस्था यांचेमार्फत उपचारादरम्यान मृत झालेल्या व्यक्तीच्या वारसास रुपये २.५० लाख तर जखमी व्यक्तीस रुपये १.७५ लाख अदा करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे २ जखमी व्यक्तींच्या उपचारावर वनविभाग व इतर अशासकीय संस्थेमार्फत औषधोपचाराकरीता अंदाजे रुपये २५.०० लाख खर्च करण्यात आले आहेत. तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून दोन्ही जखमीकरीता प्रत्येकी रुपये १.०० लाख सबंधित रुग्णालयात जमा करण्यात आले आहेत.

प्रस्तुत प्रकरणामध्ये कायद्यातील तरतुदीनुसार वनगुन्हा नोंदविण्यात आला असून चौकशी दरम्यान सदर आग अज्ञात व्यक्तीने लावल्याचे निर्देशनास आले आहे. चौकशी दरम्यान वन अधिकारी अथवा कर्मचारी दोषी असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जालना जिल्हयात नुकसानग्रत सोयीबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(४५) ९५४९ (१४-०६-२०२१) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयात गत वर्षीच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी विविध कंपन्यांच्या सोयाबीन बियाणांची पेरणी केली असून सदरहू बियाणांची उगवन झाली नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी जालना जिल्हयातील सुमारे २७०० शेतकऱ्यांनी शासनाकडे तक्रारी दाखल केल्या असता यापैकी १६८ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली असून उर्वरित शेतकरी अजूनही नुकसान भरपाईच्या मदतीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस बियाणे उत्पादक कंपन्यांवर कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१४-१०-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) अंशत: खरे आहे,

जालना जिल्हयात सोयाबीन बियाणे उगवणीच्या एकूण २७४० तक्रारी प्राप्त होत्या, त्यापैकी २६७९ तक्रारींसदर्भात पंचनामे पूर्ण करुन बियाणात दोष असा निष्कर्ष तक्रार निवारण समितीने नोंदविलेला आहे.

बियाणात दोष असे निष्कर्ष नोंदविलेल्या व जास्त प्रमाणात तक्रारी असलेल्या एकूण १५ कंपन्यांवर १३ पोलीस गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही जालना जिल्हयामध्ये करण्यात आली त्याच प्रमाणे बियाणे नियम १९६८ मध्ये नियम २३A नुसार ९ कंपन्यांच्या तक्रारीसंदर्भात न्यायालयीन दावे दाखल करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

खाजगी बियाणे कंपनीमार्फत सदोष बियाणे तक्रारीपैकी २० शेतकऱ्यांना १७.४० क्विंटल बियाणे व ७१ शेतकऱ्यांना रुपये ३,८१,८५०/- इतकी नुकसान भरपाई असे एकूण ९१ शेतकऱ्यांना मदत देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला (महाबीज) मार्फत १०१ शेतकऱ्यांना रुपये ६,१९,३८०/- नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे, असे एकूण १९२ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. उर्वरित प्रकरणांपैकी काही प्रकरणामध्ये शेतकऱ्यांनी कंपन्यामार्फत देऊ केलेली मदत नाकारली आहे.

बियाणे कायदा १९६६ व बियाणे नियंत्रण आदेश १९८३ मध्ये नुकसान भरपाईची तरतुद नसल्याने तक्रारदार शेतकऱ्यांना तालुका तक्रार निवारण समितीचा अहवाल देऊन जिल्हा ग्राहक मंचात दाद मागणेबाबत मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील प्रत्येक गावात मोबाईल व इंटरनेट सेवा उपलब्ध करण्याबाबत

**(४६) ९५६१ (१५-०७-२०२१) श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अंदाजे २८०० गावांमध्ये मोबाईल कनेक्टीविटीचा अभाव असून गावातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण व इतर सुविधा मिळत नसल्याने केंद्र सरकारच्या राष्ट्रीय ब्रॉडबँड मिशन कार्यक्रम अंतर्गत इंटरनेट सेवा उपलब्ध नसलेली गावे इंटरनेट सेवेने जोडावित यावी याकरीतासाठी शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील प्रत्येक गावात मोबाईल व इंटरनेट सेवा पोहचविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२०-०९-२०२१) :** (१) केंद्र शासनाने देशातील सर्व गावामध्ये वर्ष २०२२ पर्यंत ब्रॉडबँड इंटरनेट उपलब्ध करून देण्याचे ठरविले आहे. त्या अन्वये राष्ट्रीय ब्रॉडबँड मिशन कार्यक्रम आपला असून राज्यामध्ये सदर राष्ट्रीय ब्रॉडबँड मिशन अंतर्गत राज्य ब्रॉडबँड मिशन राबविण्याकरीता समिती स्थापन केलेली आहे. सदर समितीमध्ये केंद्र शासनाचे तसेच COAI व TAIPA या संस्थेचे सभासद सदस्य आहेत. सदर समिती मोबाईल कनेक्टीविटी व ब्रॉडबँड इंटरनेट गाव पातळी पर्यंत विस्तार करण्याकरीता कार्य करते. मोबाईल कनेक्टीविटी नसलेली गावे राष्ट्रीय ब्रॉडबँड मिशन कार्यक्रम अंतर्गत शासनाच्या दुरसंचार विभागामार्फत हाताळण्यात येत असल्याने वेगळयाने पाठपुरवठा करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील फेरीवाल्यांना शासकीय अनुदान त्वरित मिळण्याबाबत

**(४७) ९५९२ (१८-०६-२०२१) श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ११६८ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: बृन्हमुंबई महानगरपालिका अख्यातरित राष्ट्रीय फेरीवाला धोरणाच्या अंमलबजावणीला ५ वर्षापेक्षा अधिक उशीर झाल्यामुळे त्याचा फटका फेरीवाल्यांना बसला असून सदर धोरण प्रलंबित राहिल्यामुळे पहिल्या व दुसऱ्या टाळे बंदीच्या काळात केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या अनुदानापासून फेरीवाल्यांना वंचित रहावे लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत मुंबईत लाखो फेरीवाले असतानाही जेमतेम केवळ १५ हजार ३६१ फेरीवालेच अधिकृत ठरल्यामुळे उक्त फेरीवाल्यांना जागा देण्यासाठी महापालिकेने पथविक्री जागा क्षेत्र (हॉकर्स झोन) व पथविक्री जागा (पीचेस) तयार केल्यानुसार मुंबईतील ४०४ रस्त्यांवर ३० हजार ८३२ जागा निश्चित करण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टाळेबंदीमुळे फेरीवाला धोरणाची अंमलबजावणीच होऊ न शकल्यामुळे फेरीवाल्यांना शासनाचे अनुदान मिळवताना नाहक समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून सर्व पात्र फेरीवाल्यांना देय असलेले अनुदान विनाविलंब मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२), (३) व (४) मुंबईत १५ हजार ३६१ फेरीवाले हे अधिकृत फेरीवाले नसून पात्र फेरीवाले आहेत. या पात्र फेरीवाल्यांना पथविक्रेता प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने केंद्र शासनाचा पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ व राज्य शासनाचा, महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका व संरक्षण आणि पदपथावरील विक्रीचे विनियमन)(महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील तरतुदीनुसार जे पथविक्रेते उक्त नियम व योजनेतील निकष पूर्ण करु शकतात त्यांनाच पथविक्री प्रमाणपत्र देण्याकरीता पात्र ठरविण्यात आले आहे. तसेच नियम व योजनामधील तरतुदीनुसार पथविक्री जागा (पीचेस) निश्चित करण्यात आल्या आहेत.

मुंबईतील एकूण ४०४ रस्त्यांवर ३०,८३२ पथविक्री जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. तसेच पात्र पथविक्रेत्यांची संगणकीय नोंदणी पूर्ण करण्यात आली असून त्यांना नोंदणी प्रमाणपत्र, ओळखपत्र, पथविक्री जागांचे वाटप तसेच पथविक्री प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) व (४) फेरीवाल्यांना केंद्र शासनाद्वारे PMSVanidhi योजनेतील कर्ज देण्याकरीता निकष ठरविण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन तसेच पथविक्रेता संबंधित सर्वेक्षण करण्यात आलेल्या ९९,४३५ पथविक्रेत्यांना भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून PMSVanidhi योजनेची माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार एकूण २१,५२६ पथविक्रेत्यांनी अर्ज केले आहेत.

पथविक्रेत्यांना अनुदान देण्याबाबत राज्य शासनाने योजना जाहीर केली आहे. त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पथविक्रेत्यांच्या बँकेच्या खात्याच्या माहितीत तफावत असलेल्या एकूण ३५९३ पथविक्रेत्यांची यादी प्राप्त झाली होती. या सर्व पथविक्रेत्यांना भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधून त्यापैकी एकूण २६४५ पथविक्रेत्यांची बँकेसंबंधित माहिती प्राप्त करुन घेऊन ती अद्ययावत करण्यात आली आहे. उर्वरित पथविक्रेत्यांची माहिती प्राप्त करणेकरीता त्यांचेशी वारंवार संपर्क साधला जात आहे असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## अनुसूचित जातीच्या युवकांना उद्योग सुरु करण्यासाठी सहाय्य ठरणाऱ्या सहकारी संस्थासाठी नविन औद्योगिक धोरण राबविण्याबाबत

**(४८) ९७६८ (१७-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या युवकांना उद्योग सुरु करण्यासाठी सहाय्य ठरणाऱ्या सहकारी संस्थांसाठी नवी औद्योगिक धोरण राबविण्याचा निर्णय दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार नवीन औद्योगिक धोरण तयार करण्यात आले आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, हे धोरण साध्य करण्यासाठी किती निधी अपेक्षित आहे, तसेच सदर निधीची पूर्तता होण्यासाठी कोणते पर्याय अवलंबिण्यात येणार आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उद्योग सुरु करण्यासाठी सहाय्य ठरणाऱ्या सहकारी संस्थांसाठी औद्योगिक धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०८-१०-२०२१) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. मऔधो २०१९ /प्र.क्र.६/उद्योग-२, दिनांक ७/०३/२०१९ अन्वये नवीन औद्योगिक धोरणास मान्यता देण्यात आलेली आहे. नवीन औद्योगिक धोरणानुसार महिला/ अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती उद्योजकांकडून सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांसाठी विकसित केलेल्या औद्योगिक वसाहतींना प्राधान्य दिले जाईल व जास्तीचे १०० टक्के आर्थिक सहाय्य दिले जाईल. त्यासाठीचा निधी सामाजिक न्याय विभाग, आदिवासी विकास विभाग यांचेकडून उपलब्ध करुन घेण्यात येईल अशी तरतूद आहे.

शासन निर्णय दिनांक २६/०२/२०२१ अन्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर (अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती) उद्योजकांसाठी विशेष सामुहिक योजनेंतर्गत पायाभूत सुविधांसाठी कार्यपध्दती व मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तक हे अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती प्रवर्गातील व्यक्ती अथवा त्यांनी स्थापित केलेली संस्था/ औद्योगिक समूह हे राहतील. योजनेचा तपशिल- निधीचे व्यवस्थापन, प्रकल्प कालावधी इ.मार्गदर्शक तत्वे विहीत केलेली आहेत. सदर शासन निर्णयामध्ये विवक्षितपणे सहकारी संस्थांचा कोठेही उल्लेख नाही. मुख्यत: सदर योजनेद्वारे देण्यात येणारी प्रोत्साहने ही संस्थांसाठी देण्यात येत नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिंचपुर इजदे ते नवगण राजुरी (जि.बीड) या राष्ट्रीय महामार्गाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४९) ९८७३ (१७-०६-२०२१) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचपुर इजदे ते नवगण राजुरी (जि.बीड) या ४५ किलोमीटरच्या राष्ट्रीय महामार्गाचे काम केवळ २५ टक्के पूर्ण होवून उर्वरित काम अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड या जागतिक महामारीच्या काळात अनेक गावांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे रूग्णांवर त्वरित उपचार न होणे, वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्याने रुग्णांचा जीव वाचविणे शक्य न होणे, ऑक्सिजन पुरवठा वेळेत न होणे तसेच अपघात होऊन अनेकांनी जीव गमावल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करुन तात्काळ मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (२०-०९-२०२१) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय महामार्गाचे काम अपूर्ण असल्यामुळे रुग्णांवर उपचार करण्यासाठी इतर पर्यायी रस्त्यांचा वापर होऊ शकतो. तसेच या रस्त्यांच्या कामामुळे अपघात झाल्याचे कुठल्याही घटना घडल्या नाहीत. त्यामुळे हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

रस्त्याच्या अपूर्ण कामामुळे वाहतूक अडथळा निर्माण झालेला नाही. तसेच हानी झालेली नाही. त्यामुळे शासनाने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) विलंबाचे कारण नाही. त्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: कळंब तालुक्यात यवतमाळ-पांढरकवडा महामार्गावरील एका खेड्यात बालविवाह करण्यात आल्याबाबत

**(५०) ९९०५ (१७-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना कालावधीत उदरनिर्वाहाचा प्रश्न, स्थलांतर, टाळेबंदीमुळे घरात असलेल्या मुलींची चिंता आणि लग्नाच्या खर्चात होणारी बचत अशा विविध कारणांमुळे राज्यात बालविवाहाचे प्रमाण वाढल्याची बाब दिनांक ३० मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळंब तालुक्यात यवतमाळ-पांढरकवडा महामार्गावरील एका खेड्यात बालविवाह प्रतिबंधक कायद्याची पायमल्ली करुन बालविवाह करण्यात आल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदर बालविवाहामध्ये संबंधित गावातील बालसंरक्षण समिती उपस्थित होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकारणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील बालविवाह रोखण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)(०९-०८-२०२१) :** (१) होय.

(२) नाही.

सदर बालविवाह ४ मे २०२१ रोजी घडला असून गाव बाल संरक्षण समितीच्या सदस्यांच्या उपस्थितीत सदर विवाह घडलेला नाही.

(३) या प्रकरणात चौकशी केली असता यामध्ये बालविवाह ४ मे २०२१ रोजी घडला आहे. जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे सामाजिक कार्यकर्ते श्री.आकाश बुरेवार यांनी गावामध्ये दिनांक ५ मे २०२१ रोजी भेट दिली व त्याच दिवशी अल्पवयीन मुलीला व तिच्या पालकांना गावाच्या पोलीस पाटील यांच्या मदतीने बालकल्याण समितीसमोर हजर केले. त्यानंतर बालकल्याण समितीच्या आदेशान्वये मुलीला तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

सदर प्रकरणात अल्पवयीन मुलीचे तिच्या गावातील मुलासोबत प्रेमसंबध असल्याने तिच्या मित्राच्या नातेवाईकांनी तिचे लग्न लावून दिले. या लग्नास तिचे आई वडील यांचा विरोध होता राज्यातील बालविवाह रोखण्याबाबत शासनाने खालील उपाययोजना केल्या आहेत. महिला व बालविकास विभाग, युनिसेफ आणि एस. बी. सी. ३ या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून बाल विवाह समस्येचे समूळ उच्चाटन करण्यासाठी मराठवाडा विभागातील औरंगाबाद, हिंगोली, जालना, नांदेड आणि उस्मानाबाद या ५ जिल्ह्यांसोबत दिनांक १७/११/२०२० पासून जिल्हा कृतिदल स्थापन करून प्रशासनासोबत सक्षम नावाच्या उपक्रमाची अमंलबजावणी करण्यात आली. सदर उपक्रमाच्या माध्यमातून या ५ जिल्ह्यातील बालविवाह निर्मुलनासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. तसेच राज्यातील ३५२ तालुक्यातील प्रत्येक तालुक्यातील १०० ग्राम बाल संरक्षण समितीच्या सदस्य सचिव अंगणवाडी सेविका आणि सदस्य पोलीस पाटील यांचे २ टप्प्यात तालुकास्तरीय प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये प्रामुख्याने बालविवाह या विषयावर भर देण्यात आला.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.